

# प्राचीन भारताचा इतिहास

## इयत्ता सहावी





कैलास मंदिर, वेरूळ

शिक्षणखात्याचा मंजुरी क्रमांक :

प्राशिसं/२००७-०८/मंजुरी ५०५(९) दिनांक ८.१.२००७

# प्राचीन भारताचा इतिहास

## इयत्ता सहावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

प्रथमावृत्ती : २००७
पुनर्मुद्रण :
जुलै, २०१०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

संपादक मंडळ :
श्री. बापूसाहेब शिंदे
श्री. विजयचंद्र थत्ते
डॉ. शुभांगना अत्रे
डॉ. मंजिरी भालेराव
श्री. आबासाहेब शिंदे
श्री. लक्ष्मण भोये
श्री. मोगल जाधव, समन्वयक

लेखक : प्रा. भारती जोशी

संयोजक : श्री. मोगल जाधव
विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

चित्रकार : श्री. शरद प्रभुदेसाई

नकाशाकार : श्री. रविकिरण जाधव

निर्मिती : श्री. राजेंद्र विसपुते, निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब, निर्मिती सहायक

अक्षरजुळणी : मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

कागद : ७० जी. एस. एम. क्रीमवोव्ह

मुद्रणादेश : N / PB / 2011 - 12 / 2.00

मुद्रक : Uchitha Graphic Printers Pvt. Ltd.

प्रकाशक : श्री. विवेक उत्तम गोसावी,
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## प्रास्ताविका

**आम्ही, भारताचे लोक,** भारताचे एक **सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.**

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

'राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा २०००' अनुसार महाराष्ट्र राज्यात 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००४' तयार करण्यात आला. या अभ्यासक्रमाची कार्यवाही २००६-२००७ या शालेय वर्षापासून क्रमशः सुरू झाली आहे. अभ्यासक्रमात इतिहास व नागरिकशास्त्र हे विषय इयत्ता तिसरीपासून सुरू करण्यात आले आहेत. इयत्ता तिसरीपासून इयत्ता पाचवीपर्यंत 'नागरिकशास्त्र' या विषयाचा समावेश इतिहासाच्या पाठ्यपुस्तकात केलेला आहे. इयत्ता सहावीपासून 'नागरिकशास्त्र आणि प्रशासन' या विषयाचे स्वतंत्र पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे.

शासनमान्य अभ्यासक्रमानुसार मंडळाने इतिहास विषयाचे इयत्ता सहावीचे प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार केले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया विद्यार्थिकेंद्रित असावी, स्वयं-अध्ययनावर भर दिला जावा, प्राथमिक शिक्षणाच्या अखेरीस विद्यार्थ्यांनी 'किमान क्षमता' प्राप्त कराव्या, शिक्षणाची प्रक्रिया आनंददायी व्हावी असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे. 'स्वयं-अध्ययन' सुलभ व्हावे, म्हणून पुस्तकात प्रत्येक पाठावर स्वाध्याय दिले आहेत. पाठ्यपुस्तकात काही पाठांच्या खाली चौकटीत विषयाशी संबंधित पूरक माहिती दिलेली आहे. त्या माहितीवर प्रश्न विचारणे अपेक्षित नाही.

पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. संपादक मंडळ, लेखक आणि चित्रकार यांनी अतिशय आस्थेने हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मनःपूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी आशा आहे.

(डॉ. वसंत काळपांडे)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक** : २२ जानेवारी २००७
४ माघ, शके १९२८

# अनुक्रमणिका


१. इतिहासाची आवश्यकता .... १

२. इतिहासाची साधने .... ५

३. प्राचीन मानवाचे जीवन .... १०

४. हडप्पा संस्कृती .... १५

५. हडप्पाकालीन लोकजीवन .... १९

६. वैदिक संस्कृती .... २४

७. वैदिक काळातील लोकजीवन .... २७

८. नवे धार्मिक प्रवाह .... ३०

९. महाजनपदे .... ३५

१०. मौर्यकालीन भारत .... ४१

११. उत्तरेकडील प्राचीन राज्ये .... ४८

१२. दक्षिणेकडील प्राचीन राज्ये .... ५४

१३. भारत : सांस्कृतिक .... ६०

१४. प्राचीन भारत आणि जग .... ६४

परिशिष्ट .... ६९

# १. इतिहासाची आवश्यकता

**इतिहास म्हणजे काय ? :** आज आपण ज्या काळात राहतो तो वर्तमानकाळ. त्यापूर्वी होऊन गेलेला काळ म्हणजे भूतकाळ. भूतकाळात घडलेल्या विविध घटना इतिहासात सांगितल्या जातात. भूतकाळातील घटनांची सुसंगतपणे दिलेली माहिती म्हणजे इतिहास होय. इतिहासाचे प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक असे तीन कालखंड पडतात.

भूतकाळात जे काही घडले ते समजून घेणे, म्हणजे इतिहासाचा अभ्यास करणे होय. मानव पृथ्वीवर लाखो वर्षांपासून राहत आहे. या प्रदीर्घ काळात मानवाने चिकाटीने प्रयत्न करून प्रगती केली. हा त्याचा मार्ग सोपा नव्हता. त्यासाठी मानवी समाजाला खूप प्रयत्न करावे लागले. याची माहिती इतिहासामुळे कळते.

**इतिहासाची आवश्यकता :** मानवाने त्याच्या आसपासच्या परिसरातील साधनसंपत्तीचा उपयोग करून अन्न, वस्त्र व निवारा मिळवला. निसर्गाच्या साहाय्याने मानवाचे जीवन सुखकर झाले. निसर्गातील सर्व घटक टिकून राहिले तरच मानवाचे आयुष्य अधिक समृद्ध होणार आहे. मानव लाखो वर्षांत कसा राहिला, त्याचे अन्न कोणते, त्याची वस्त्रे कशा प्रकारची होती, असे अनेक प्रश्न आपल्याला पडतात. या प्रश्नांची उत्तरे इतिहासाच्या अभ्यासातून मिळतात.

इतिहासाच्या अभ्यासातून आपल्या पूर्वजांनी केलेली प्रगती समजते. त्यामुळे आपल्या पूर्वजांविषयी आपल्या मनात स्वाभिमानाची भावना निर्माण होते. पूर्वजांनी केलेल्या चुका आपल्याला टाळता येतात आणि भविष्यकाळात प्रगती करणे शक्य होते.


**इतिहासातील कालगणना :** भूतकाळात ज्या घटना घडल्या त्या केव्हा घडल्या हे समजून घ्यावे लागते. घडलेल्या घटना परस्परांशी संबंधित असतात. उदाहरणार्थ, जेम्स वॅट याने वाफेच्या शक्तीचा शोध लावला. त्यानंतर वाफेवर चालणारी यंत्रे निर्माण झाली. अशा घटनांचा कालक्रमानुसार अभ्यास केल्यास त्यांचा परस्पर संबंध लक्षात येतो. घटनांचा कालक्रम ठरवण्यासाठी काळ मोजण्याची जी पद्धत वापरतात तिला 'कालगणना' असे म्हणतात.

**कालगणना :** स्थूलमानाने येशू ख्रिस्तांच्या जन्मवर्षापासून इसवी सनाची कालगणना करतात. येशू ख्रिस्तांना अरबी भाषेत 'ईसा' असे म्हणतात. ईसावरून 'इसवी' असा शब्द तयार झाला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्व देशांना सोईचे व्हावे, म्हणून इसवी सन ही कालगणना आज सर्व जगभर वापरली जाते. 'सन' म्हणजे वर्ष किंवा 'साल'.

इसवी सनाच्या सुरुवातीपासून १०० वर्षांनी एखादी घटना घडल्यास ती कोणत्या वर्षातील ? इसवी सन १०० मधील. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात १९४२ ला 'छोडो भारत' आंदोलन झाले, म्हणजेच ही घटना ख्रिस्त जन्मानंतर १९४२ वर्षांनी घडली, म्हणून या घटनेचा उल्लेख 'इसवी सन १९४२ मध्ये 'छोडो भारत' आंदोलन झाले,' असा करतात. ख्रिस्त जन्मानंतर घडलेल्या सर्व घटनांचा काळ या पद्धतीने लिहिला जातो.

इसवी सन सुरू होण्यापूर्वीही अनेक महत्त्वाच्या घटना घडल्या. मग त्यांचा काळ आपण कसा लिहिणार ?

वर्धमान महावीरांचा जन्म इसवी सनाच्या ५९९ वर्षे अगोदर झाला, म्हणून 'वर्धमान महावीरांचा जन्म इसवी सन पूर्व ५९९ मध्ये झाला,' असे लिहितात. पुढील कालरेषेचा अभ्यास करूया, म्हणजे हे कालमापन अधिक चांगले समजेल.




ऐतिहासिक कालगणना करताना अनेक वेळा शतकांचा उल्लेख केला जातो. उदाहरणार्थ, भारतात व्यापारासाठी पाश्चात्त्य व्यापारी इसवी सनाच्या १६ व्या शतकापासून येऊ लागले. महाराष्ट्रात १९ व्या शतकात समाजसुधारणेसाठी प्रयत्न सुरू झाले. या विधानातील शतक हा शब्द १०० वर्षे अशा अर्थी वापरला आहे.

इसवी सन १ ते इसवी सन १०० या कालखंडास इसवी सनाचे 'पहिले शतक' म्हणतात. इसवी सन १९०१ ते २००० या काळातील १०० वर्षांना २० वे शतक असे म्हटले जाते. इसवी सन पूर्व पहिले शतक, म्हणजे इसवी सन सुरू होण्यापूर्वीची पहिली १०० वर्षे. बौद्ध धर्माची स्थापना इसवी सन पूर्व सहाव्या शतकात झाली, म्हणजेच इसवी सन पूर्व ६०० ते इसवी सन पूर्व ५०१ या दरम्यान झाली.

सनाच्या उल्लेखाने नेमक्या वर्षांचा बोध होतो, तर शतकाच्या उल्लेखाने ढोबळमानाने त्या शतकाच्या कालखंडाचा बोध होतो.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) भूतकाळातील घटनांची सुसंगतपणे दिलेली माहिती म्हणजे .......... होय.

(आ) इतिहासाच्या अभ्यासातून आपल्या पूर्वजांनी केलेली .......... समजते.

(इ) येशू ख्रिस्तांना अरबी भाषेत .......... असे म्हणतात.

(ई) इसवी सन १ ते इसवी सन १०० या कालखंडास इसवी सनाचे .......... म्हणतात.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) इतिहासाचे कोणते कालखंड पडतात?

(आ) इसवी सनाची कालगणना केव्हापासून करतात?

(इ) इसवी सन ही कालगणना आज जगभर का वापरतात?

**उपक्रम**

तुमच्या वहीत कालरेषा काढा आणि त्या कालरेषेवर पुढील घटनांची नोंद करा.

(अ) 'छोडो भारत' आंदोलन - इसवी सन १९४२

(आ) भारत स्वतंत्र झाला - इसवी सन १९४७


(इ) वर्धमान महावीरांचा जन्म - इसवी सन पूर्व ५९९

# २. इतिहासाची साधने

भूतकाळातील मानवाने वापरलेल्या असंख्य वस्तू आजही सापडतात. अशा वस्तूंना 'ऐतिहासिक अवशेष' असे म्हटले जाते. या अवशेषांत दैनंदिन वापराच्या वस्तूंबरोबर किल्ले, लेणी, स्तूप, नाणी, शिलालेख इत्यादींचाही समावेश होतो. याशिवाय चालीरीती, परंपरा, लोकसाहित्य, ऐतिहासिक कागदपत्रे, लोककला यांच्याही आधारे आपल्याला इतिहास कळतो. या सर्वांना 'इतिहासाची साधने' म्हणतात.

इतिहासाच्या अभ्यासाची साधने तीन प्रकारची आहेत. भौतिक साधने, लिखित साधने, मौखिक साधने.

**भौतिक साधने** : मानवाने अश्मयुगात दगडापासून तयार केलेली हत्यारे वापरली, तर त्यापुढील काळात तांबे, कांस्य, लोखंड इत्यादी धातूंचा वापर करून हत्यारे बनवली. विविध हत्यारांत झालेल्या या सुधारणांच्या आधारे मानवाच्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीची माहिती मिळते. पुरातन काळातील काही वस्तू, घरे, इमारती, लेणी, मंदिरे यांच्याद्वारे त्या काळाविषयी महत्त्वाची माहिती मिळते.




उत्खननाचे दृश्य

पुरातन काळातील अवशेष भूकंप, महापूर किंवा अन्य कारणांनी जमिनीखाली गाडले जातात. हे अवशेष जसेच्या तसे

बाहेर काढण्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीने जमिनीचे खोदकाम करतात, त्याला 'पुरातत्त्वीय उत्खनन' असे म्हणतात. या उत्खननात सापडलेल्या अवशेषांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करावा लागतो. त्या शास्त्राला 'पुरातत्त्व विद्या' असे म्हणतात.

सापडलेल्या पुरातन वस्तूंमधील खापराच्या तुकड्यांचे आकार, त्यांवरील रंग आणि नक्षी, त्यांची जाडी यांवरून ही भांडी कोणत्या काळातील असावीत याचा अंदाज बांधता येतो. दागदागिने आणि इतर वस्तूंवरून मानवी समाजाच्या परस्पर संबंधांची माहिती मिळते. धान्यांचे कण, फळांच्या बिया आणि प्राण्यांची हाडे यांवरून आहाराची माहिती मिळते. वेगवेगळ्या काळांत माणसाने बांधलेल्या घरांचे आणि इमारतींचे अवशेष सापडतात. याशिवाय नाणी, मुद्राही सापडतात. या सर्वांच्या साहाय्याने मानवी व्यवहारांची माहिती होते. मानवी प्रगतीचे टप्पेही कळतात. या सर्व वस्तूंना 'भौतिक साधने' असे म्हणतात.

**लिखित साधने** : मंदिरांच्या, लेण्यांच्या भिंती, शिळा, ताम्रपट, भांडी, कच्च्या विटा इत्यादींवर कोरलेल्या लेखांचा समावेश लिखित साधनांत होतो.



शिलालेख

ताम्रपट

सुरुवातीच्या काळात माणूस कच्च्या विटा, पपायरस झाडाच्या साली, ताडपत्रे, भूर्जपत्रे यांवर बोरूने लिहीत असे. लिहिण्यासाठी वापरलेले रंग

वनस्पतींपासून तयार केले जात. तसेच डिंक, काजळी व पाणी यांच्या मिश्रणातून तयार केलेल्या शाईचा वापर केला जात असे.

मानवाला लिपीचा विकास करण्यासाठी हजारो वर्षे लागली. माणसाचा अनुभव व ज्ञान जसजसे वाढत गेले, तसे त्याने विविध पद्धतीने लेखन करण्यास सुरुवात केली. सभोवताली घडलेल्या घटना, दरबारी कामकाजाचे वृत्तान्त इत्यादी माहिती लिहून ठेवण्याची पद्धत सुरू झाली. अनेक राजांनी आपल्या आज्ञा, निवाडे, दानपत्रे दगडांवर किंवा तांब्याच्या पत्र्यांवर कोरून ठेवली आहेत. कालांतराने वाङ्मयाचे अनेक प्रकार निर्माण झाले. नाटके, काव्ये, प्रवासवर्णने तसेच शास्त्रीय विषयांवरील लेखन झाले. अशा साहित्याला 'लिखित साधने' असे म्हणतात.

**मौखिक साधने** : काही साहित्य माहितीच्या किंवा पाठांतराच्या रूपाने एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे दिले जाते. पिढ्यान्‌पिढ्या असे साहित्य जपले जाते. ते लिखित स्वरूपात नसते. या साहित्याला 'मौखिक साधने' असे म्हणतात.

मौखिक साधनांमध्ये ओव्या, लोकगीते, लोककथा इत्यादींचा समावेश होतो.

**भारताच्या प्राचीन इतिहासाची साधने** : भारताच्या पुरातन काळातील माहिती पुरातत्त्वीय उत्खननातून मिळते. ज्या काळातील लिखित साधने उपलब्ध नाहीत, त्या काळासंबंधी ही माहिती विशेष महत्त्वाची ठरते. उत्खननात मिळणाऱ्या मानवी हाडांवरून व्यक्तीचे वय, लिंग यांची माहिती मिळते. नगररचनेच्या अवशेषांमुळे तत्कालीन रस्ते, घरे यांच्या बांधकामाची कल्पना येते.

वैदिक वाङ्मय, रामायण आणि महाभारत ही महाकाव्ये, जैन आणि बौद्ध धर्मांचे ग्रंथ यांमुळे भारताचा प्राचीन इतिहास समजण्यास मदत होते. शिलालेख, परकीय प्रवाशांची प्रवासवर्णने इत्यादी साधनेही इतिहास समजण्यास उपयुक्त ठरतात. ताम्रपट म्हणजे तांब्याच्या पत्र्यावर कोरलेले

लेख. निरनिराळ्या राजांच्या काळात दिलेल्या दानांचा उल्लेख ताम्रपटावर असतो. त्यात दान देण्याचा काळ, स्थळ, प्रसंग यांच्या नोंदी सापडतात.

नाण्यांमुळे भारताच्या प्राचीन इतिहासाचा पुरावा मिळतो. काही नाण्यांवर राजांची नावे दिलेली असतात. नाण्यांत वापरलेल्या धातूंवरून त्या काळातील आर्थिक परिस्थिती कळते.

**इतिहास लेखनाबाबत घ्यायची काळजी :** या सर्व साधनांद्वारे इतिहास लिहिताना काळजी घ्यावी लागते. उत्खननात सापडलेल्या वस्तूंचा कालखंड शास्त्रीय पद्धतीने ठरवावा लागतो. उत्खननात सापडलेले पुरावे लिखित साहित्याशी पडताळून पाहावे लागतात. त्याचप्रमाणे लिखित साहित्यातील पुरावेही तपासून पाहणे आवश्यक असते. त्यांची छाननी करून इतर साधनांच्या साहाय्याने विश्वासार्ह ठरलेल्या निष्कर्षांशी ते पडताळून पाहावे लागतात. इतिहास लेखनात अशा शास्त्रीय पद्धतीच्या वापराला महत्त्व असते.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) विविध हत्यारांत झालेल्या सुधारणांच्या आधारे मानवाच्या .......... प्रगतीची माहिती मिळते.

(आ) उत्खननात सापडलेल्या अवशेषांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणाऱ्या शास्त्राला............. असे म्हणतात.

(इ) ताम्रपट म्हणजे .......... पत्र्यावर कोरलेले लेख.

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (अ) भौतिक साधने | (१) लोकगीते |
| (आ) लिखित साधने | (२) लेणी |
| (इ) मौखिक साधने | (३) दानपत्रे |
| | (४) चालीरीती |

३. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) इतिहासाच्या अभ्यासाची साधने कोणत्या प्रकारची आहेत?

(आ) सुरुवातीच्या काळात माणूस बोरूने कशावर लिहीत असे?

(इ) उत्खननात मिळणाऱ्या मानवी हाडांवरून कोणती माहिती मिळते?

४. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) पुरातत्त्वीय उत्खनन म्हणजे काय?

(आ) मौखिक साधने कशाला म्हणतात?


**उपक्रम**

(अ) लोकगीतांचा संग्रह करा व ती शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात साभिनय सादर करा.

(आ) तुमच्या परिसरात सुरू असलेल्या खोदकामास भेट द्या. तेथे सापडलेल्या वस्तूंची माहिती खालील मुद्द्यांच्या आधारे मिळवा.

(१) वस्तूंची नावे (२) वस्तूंचे वर्गीकरण (३) वस्तूंचा उपयोग

**पपायरस** : प्राचीन इजिप्तमधील लोक लेखनासाठी जो कागद वापरत त्याला 'पपायरस' हे नाव आहे. पपायरस नावाच्या वनस्पतीपासून हा कागद बनवत. पपायरस कागद महत्त्वाच्या लेखनासाठी वापरत. पपायरस कागदावर केलेले लेखन हजारो वर्षे उलटली तरी जसेच्या तसे राहिलेले आढळते. प्राचीन लेखन असलेल्या पपायरसच्या अनेक गुंडाळ्या इजिप्तमधील ठिकठिकाणच्या उत्खननात सापडल्या आहेत. त्यावरून इजिप्तच्या इतिहासातील अनेक घटना व त्यांचे तपशील यांचे ज्ञान झाले आहे.



# ३. प्राचीन मानवाचे जीवन

मानव सुरुवातीला जंगलात राहत होता. जंगली प्राण्यांपासून स्वत:चे संरक्षण करणे त्याला गरजेचे वाटू लागले, म्हणून आपल्या बुद्धीचा वापर करून तो लाकूड, दगड, हाडे यांपासून हत्यारे तयार करू लागला. या हत्यारांमधील दगडी हत्यारे अधिक काळ टिकून राहतात. त्यामुळे ती मोठ्या प्रमाणात सापडतात, म्हणून या कालखंडाला 'अश्मयुग' असे म्हणतात.

उत्खननामध्ये दगडी हत्यारे विपुल प्रमाणात सापडली आहेत. अश्मयुगातील हत्यारे बनवण्याच्या तंत्रात मानवाने सतत प्रगती केली. अश्मयुगाचे पुराश्मयुग आणि नवाश्मयुग असे दोन टप्पे मानले जातात. नवाश्मयुगाची सुरुवात सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी झाली. या काळामध्ये माणसाला शेती आणि पशुपालन कसे करावे हे कळले. तसेच त्याला धातूचेही ज्ञान झाले. शेतीसाठी लागणाऱ्या दगडांच्या अवजारांबरोबरच तो धातूच्या वस्तूही बनवू लागला.

**अन्न** : मानव फळे, कंदमुळे, मांस खात असे. लहान प्राण्यांची शिकार करत असे. तो मासेमारीही करत असे. अन्न शिजवण्यासाठी अग्नीचा उपयोग होऊ शकतो, हे त्याला कालांतराने समजले.


**शेती** : प्राचीन काळापासून शिकार व हत्यारे तयार करण्याचे काम बहुधा पुरुषांकडे असे, तर कंदमुळे, फळे गोळा करणे, अन्नाची व्यवस्था करणे ही कामे स्त्रियांकडे असत. बी जमिनीवर पडले तर त्यापासून नवी रोपे उगवतात हे स्त्रियांना निरीक्षणातून समजले. यातूनच नवाश्मयुगामध्ये धान्य पेरून शेती करण्यास प्रारंभ झाला. शेती हा पुढील काळात मानवाचा मुख्य व्यवसाय बनला.

मानव तांदूळ, सातू, गहू, बाजरी, ज्वारी ही तृणधान्ये पिकवत असे.

तसेच तो वाटाणा, घेवडा, हरभरा, मूग व मसूर ही द्‌विदल धान्ये पिकवत असे. जमीन नांगरण्यासाठी दगडी फाळ, सांबर शिंग किंवा टोकदार कठीण लाकूड वापरले जाई. अशा रीतीने अन्न गोळा करणारा माणूस अन्ननिर्माता बनला. त्यामुळे नवाश्मयुगात माणूस स्थिर झाला.

**पशुपालन** : मानव गाय-बैल, शेळ्या, मेंढ्या, डुकरे, गाढव या प्राण्यांचे कळप बाळगू लागला. शेतीसाठी पशूंचा वापर करू लागला.

**हत्यारे व अवजारे तयार करण्याचे तंत्रज्ञान** : सुरुवातीला दगडांचे छिलके उडवून, हाडे व लाकूड तासून हत्यारे तयार केली जात. हातकुऱ्हाडी, तासण्या ही अश्मयुगीन मानवाची अवजारे होती. नंतर तो पातळ व सरळ पाती असलेली हत्यारे बनवू लागला. त्यासाठी तो गारगोटीचा दगड वापरू लागला. ही हत्यारे लाकडी किंवा हाडांच्या दांड्यात बसवली जात असत. या हत्यारांमुळे माणसाला विविध प्रकारची कामे करणे शक्य झाले.




अश्मयुगीन हत्यारे

धारदार हत्यारांचा उपयोग कातडी कापण्यासाठी, टोकदार हत्यारांचा उपयोग भोके पाडण्यासाठी होत असे. हाडे, हस्तिदंत, शिंगे, माशांचे काटे यांपासून त्याने दाभण, बाणाची टोके, गळ यांसारखी अवजारे तयार केली.

**कला आणि हस्तव्यवसाय** : प्राचीन मानवाने गुहांच्या भिंतींवर चित्रे

काढलेली दिसतात. काही चित्रांमध्ये शिकारीची दृश्ये आहेत. तसेच सामूहिक नृत्यांची आणि विविध प्राण्यांची चित्रे काढलेली आढळतात.



प्राचीन गुहाचित्र - भीमबेटका

शंख, हस्तिदंत, मणी यांचा वापर दागिने तयार करण्यासाठी होत असे.

नवाश्मयुगात माणूस मातीपासून प्राण्यांच्या आणि मानवाच्या प्रतिकृती बनवू लागला. याच काळात माणसाला चाकाचा शोध लागला. चाकाचा उपयोग वाहतुकीसाठी व मातीची भांडी बनवण्यासाठी केला जात असे. चाकाच्या शोधामुळे मानवाच्या प्रगतीला वेग आला.

**गाव-वसाहती :** नवाश्मयुगात मानवाच्या जीवनाला स्थिरता आली. माणसे संरक्षण आणि सोईसाठी एकमेकांच्या शेजारी घरे बांधून राहू लागली. यातूनच गाव-वसाहती निर्माण झाल्या.

**नागर संस्कृतीचा उदय :** शेतीला जोडून इतर व्यवसाय निर्माण होऊ

लागले. शेतमालाच्या व इतर वस्तूंच्या भरपूर उत्पादनामुळे व्यापार सुरू झाला. व्यापाराच्या दृष्टीने सोईस्कर अशा ठिकाणी नगरे निर्माण झाली. अशा रीतीने नागरी संस्कृतीचा पाया घातला गेला. नागरी संस्कृती नद्यांच्या परिसरात निर्माण झाल्या. भारतात या काळात सिंधू नदीच्या खोऱ्यात नागरी संस्कृती अस्तित्वात आली. आशिया खंडात तैग्रिस, युफ्रेटिस या नद्यांच्या खोऱ्यांत आणि आफ्रिका खंडातील नाईल नदीच्या खोऱ्यात नागरी संस्कृती भरभराटीला आल्या.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) जमीन नांगरण्यासाठी .........., सांबर शिंग किंवा टोकदार कठीण लाकूड वापरले जाई.

(आ) मानवाच्या प्रगतीला .......... शोधामुळे वेग आला.

(इ) आफ्रिका खंडातील .............. नदीच्या खोऱ्यात नागरी संस्कृती भरभराटीला आली.

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) अश्मयुगाचे कोणते दोन टप्पे मानले जातात?

(आ) प्राचीन काळात स्त्रियांकडे कोणती कामे असत?

(इ) अश्मयुगीन मानवाची अवजारे कोणती होती?

**३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) अश्मयुग म्हणजे काय?

(आ) गाव-वसाहती कशा निर्माण झाल्या?


(इ) नागरी संस्कृतीचा पाया कसा घातला गेला?

**उपक्रम**

अश्मयुगातील हत्यारे व अवजारांची चित्रे काढा. त्या चित्रांसमोर त्यांचा उपयोग लिहा.

**मानवाची उत्क्रांती :** पृथ्वी हा सूर्यमालेतील एक ग्रह आहे. पृथ्वीची उत्पत्ती सुमारे चारशे पन्नास कोटी वर्षांपूर्वी झाली. प्रथम ती वायुरूप होती. कालांतराने हळूहळू ती घनरूप झाली. नंतर जमीन निर्माण झाली. पृथ्वीवर जलसाठे निर्माण झाले. पाण्यात शेवाळासारख्या वनस्पती निर्माण झाल्या. या सुमारास एकपेशीय सूक्ष्म सजीव निर्माण झाले. पुढे एकपेशीय सजीवांपासून पृथ्वीवरील सजीव प्राण्यांची उत्पत्ती क्रमाक्रमाने झाली. एकपेशीय सजीवांपासून मानवाच्या उत्पत्तीपर्यंत जीवसृष्टीचा जो विकास होत गेला, त्या प्रक्रियेस 'उत्क्रांती' असे म्हणतात. या उत्क्रांतीला कोट्यवधी वर्षे लागली.

मानवसदृश 'एप' वानरापासून उत्क्रांत होत होत आजचा मानव निर्माण झाला. या उत्क्रांतीचे 'होमो इरेक्टस' आणि 'होमो सेपियन' असे दोन टप्पे आहेत. 'होमो' म्हणजे माणूस आणि 'इरेक्टस' म्हणजे ताठ कण्याचा. 'होमो सेपियन' म्हणजे बुद्धिमान माणूस. या टप्प्यात त्याला अग्नीचा उपयोग माहीत होता. तो अग्नी निर्माण करू लागला. दगडी हत्यारे घडवू लागला.



उत्क्रांतीचे टप्पे

# ४. हडप्पा संस्कृती

पंजाबमधील रावी नदीच्या काठी हडप्पा येथे इ.स. १९२१ मध्ये रेल्वेमार्गाचे काम चालू असताना काही पुरातन विटा व चित्रलिपी असलेल्या मुद्रा आढळल्या. इ.स.१९२२ मध्ये सिंधमधील मोहेंजोदडो येथील उत्खननात चित्रलिपीसारखी अक्षरे असलेल्या मुद्रा सापडल्या. या अवशेषांवरून भारतातील एका प्राचीन व प्रगत संस्कृतीचा शोध लागला. ही संस्कृती सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी अस्तित्वात होती. आज हडप्पा व मोहेंजोदडो ही ठिकाणे पाकिस्तानमध्ये आहेत.




The territorial waters of India extends into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. Based upon survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright, 1999.

या संस्कृतीचे अवशेष भारतात इतरत्रही सापडले आहेत. त्यामध्ये रूपड, राखीगढी, लोथल, सुरकोटडा, धोलावीरा, कुंतासी, रंगपूर, आलमगीरपूर, कालीबंगन, दायमाबाद ही महत्त्वाची स्थळे आहेत. ही सर्व ठिकाणे नद्यांच्या खोऱ्यांत वसलेली होती. रावी व सिंधू नदीच्या खोऱ्यात हडप्पा संस्कृतीच्या वसाहती होत्या. या संस्कृतीला 'हडप्पा संस्कृती' असे म्हणतात.

सुनियोजित नगररचना, रस्ते, घरे, सांडपाण्याची व्यवस्था, स्नानगृह, अलंकार, खेळणी, मातीची भांडी, मुद्रा, तांबे, सोने आणि चांदी या धातूंचा वापर ही हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये आहेत.


**नगररचना** : काही ठिकाणी उत्खननात संपूर्ण नगराचे अवशेष सापडले आहेत. नगरांभोवती संरक्षणासाठी मोठी भिंत बांधलेली असे. या भिंतीला ठरावीक अंतरावर टेहळणीसाठी बुरूज असत.

**रस्ते** : नगरांमधील रस्ते प्रशस्त तसेच लांब व सरळ होते. ते एकमेकांना काटकोनात छेदत असत.

**घरे** : एकमेकांना काटकोनात छेदणाऱ्या रस्त्यांमुळे नगरांचे आयताकृती विभाग पडलेले होते. या प्रत्येक विभागात पंचवीस ते तीस घरे असत. ही घरे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असत. घरांचे बांधकाम कच्च्या आणि पक्क्या विटांचे असे. दोन घरांमध्ये अंतर ठेवलेले असे. हवा खेळती राहावी हा त्यामागचा हेतू होता. नद्यांना वारंवार येणारे पूर लक्षात घेऊन घरे उंच जोत्यांवर बांधत असत.

**सांडपाण्याची व्यवस्था** : रस्त्याच्या दोन्ही बाजूंची बंद गटारे जमिनीखाली सुमारे एक मीटर खोल होती. गटारे तुंबू नयेत अशी व्यवस्था केलेली होती. सांडपाण्याची ही व्यवस्था स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने आदर्श होती.

**महास्नानगृह :** मोहेंजोदडो येथे एक प्रशस्त स्नानगृह सापडले आहे. त्यातील स्नानकुंड १२ मीटर लांब, ७ मीटर रुंद व २.५ मीटर खोल या मापाचे होते. कुंडातील पाणी झिरपून जाऊ नये म्हणून ते आतून पक्क्या विटांनी बांधलेले होते. त्यात उतरण्यासाठी पायऱ्या होत्या. स्नानकुंड साफ करण्याची व्यवस्था होती. तसेच त्यातील पाणी वेळोवेळी बदलण्याची सोय होती.



महास्नानगृह

मोहेंजोदडो येथील उत्खननात असे आढळले, की सततच्या पुरांमुळे तेथील वसाहत पुन्हा पुन्हा नष्ट झाली आणि प्रत्येक वेळेस नव्याने वसवली गेली. अशा तऱ्हेने तेथे एकाच जागी एकावर एक सात वसाहतींचे अवशेष मिळालेले आहेत.

या वैशिष्ट्यांवरून ही संस्कृती नागरी संस्कृती होती असे दिसते. या संस्कृतीतील लोकांनी स्वच्छता व आरोग्यविषयक सोईंवर भर दिला होता. त्यांची नगररचना योजनाबद्‌ध होती. आधुनिक काळातील स्थानिक शासन संस्थेप्रमाणे नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणारी प्रशासकीय व्यवस्था हडप्पा संस्कृतीत असावी असे दिसते.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) रावी नदीच्या काठी .......... येथे पुरातन विटा व चित्रलिपी असलेल्या मुद्रा आढळल्या.

(आ) हडप्पा संस्कृती सुमारे........... हजार वर्षांपूर्वी अस्तित्वात होती.

(इ) हडप्पाकालीन नगरातील रस्ते एकमेकांना ............... छेदत असत.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) हडप्पा संस्कृतीचे अवशेष भारतात कोठे कोठे सापडले आहेत?

(आ) हडप्पाकालीन लोक घरे उंच जोत्यावर का बांधत?

३. **कारणे लिहा.**

(अ) हडप्पा संस्कृतीत दोन घरांमध्ये अंतर ठेवलेले असे.

(आ) मोहेंजोदडो येथील स्नानकुंड आतून पक्क्या विटांनी बांधलेले होते.

**उपक्रम**


तुमच्या भागातील सांडपाण्याच्या व्यवस्थेची माहिती घ्या आणि तिच्यातील व हडप्पाकालीन सांडपाण्याची व्यवस्था यांतील साम्य ओळखा.

# ५. हडप्पाकालीन लोकजीवन

हडप्पा संस्कृतीतील सार्वजनिक व्यवस्थेचा परिचय आपण मागील पाठात करून घेतला आहे. तेथील लोकजीवन कशा प्रकारचे होते, याची माहिती या पाठात करून घेऊ.

**अन्न** : तांदूळ, गहू, सातू, खजूर हे पदार्थ लोकांच्या अन्नातील मुख्य घटक होते. मांस, मासे, भाज्या, फळे यांचाही अन्नात समावेश होता.

**वस्त्र** : उत्खननात मिळालेले पुतळे, मुद्रांवरील चित्रे आणि कापडाचे अवशेष इत्यादी पुराव्यांवरून ते कापड विणत असावेत. स्त्री-पुरुषांच्या पोशाखांत गुडघ्यापर्यंतचे वस्त्र आणि उपरणे यांचा समावेश होता.



हडप्पाकालीन अलंकार

**अलंकार** : विविध प्रकारचे दागिने उत्खननात सापडले आहेत. हे दागिने सोने, रुपे, तांबे, रत्ने, तसेच शिंपले, कवड्या, बिया इत्यादींचे होते. अनेक पदरी माळा, अंगठ्या, बाजूबंद, कमरपट्टा हे अलंकार स्त्री-पुरुष वापरत. स्त्रिया दंडापर्यंत बांगड्या घालत. हडप्पा संस्कृतीचे लोक तांब्याच्या चकचकीत पत्र्याचे आरसे वापरत असत.

**करमणुकीची साधने** : करमणुकीच्या साधनांत नृत्य व संगीत यांना महत्त्व होते. एका मुद्रेवर नृत्याचे दृश्य आहे. मातीच्या सोंगट्या आणि फासे सापडले आहेत.



हडप्पाकालीन खेळणी

मुलांच्या विविध खेळण्यांचे अवशेष सापडले आहेत. ही खेळणी मातीची होती. त्यांमध्ये बैलगाडी, पक्ष्यांच्या आकाराच्या शिट्ट्या, खुळखुळे व निरनिराळ्या प्राण्यांच्या मूर्ती इत्यादींचा समावेश आहे.

**हडप्पाकालीन लोकांच्या धर्मकल्पना** : उत्खननात मिळालेल्या मुद्रांवरील विविध आकृती, मूर्ती यांच्या आधारे तत्कालीन धर्मकल्पनेसंबंधी अंदाज बांधता येतो. वृक्ष व प्राणी यांची चित्रे असलेल्या अनेक मुद्रा सापडल्या आहेत. यावरून या संस्कृतीत निसर्गपूजा रूढ असावी. मातृदेवतेच्या मूर्ती उत्खननात सापडलेल्या आहेत. यावरून मातृदेवतेची पूजा केली जात असावी असे वाटते. या काळात पशुपतीची पूजाही केली जात असावी. तसेच अग्निपूजाही अस्तित्वात होती.

हडप्पा संस्कृतीतील लोक मृतदेह पुरत. काही वेळा मृतदेह शवपेटीत घालून पुरले जात. मृतदेहाबरोबर अन्न, अलंकार, आयुधे इत्यादी वस्तू पुरण्यात येत असत. क्वचित प्रसंगी मृतदेहाचे दहनही केले जाई.

**मुद्रा** : हडप्पा संस्कृतीच्या लोकांच्या वापरातील मुद्राही उत्खननात सापडल्या आहेत. या मुद्रा प्रामुख्याने चौकोनी आहेत. या मुद्रांवर प्राणी व मानवसदृश आकृत्या कोरलेल्या आहेत. मुद्रेवर वरच्या बाजूला



हडप्पाकालीन मुद्रा

चित्रलिपीमध्ये काही अक्षरे कोरलेली आहेत; परंतु अजून या लिपीचे वाचन करता आलेले नाही.

**व्यवसाय व उद्योग :** शेती आणि व्यापार हे या लोकांचे प्रमुख व्यवसाय होते.

**शेती :** गहू, सातू, तीळ, तांदूळ, कडधान्ये, कापूस ही पिके घेतली जात. शेतीबरोबर पशुपालनाचा व्यवसाय केला जात होता.

**भांडी :** भांडी तयार करणे हा एक महत्त्वाचा उद्योग होता. हडप्पा संस्कृतीच्या अवशेषांत प्रामुख्याने लाल रंगाच्या मातीची भांडी सापडली



हडप्पाकालीन भांडी

आहेत. काही भांड्यांवर प्राण्यांच्या आणि पाना-फुलांच्या आकृत्या आहेत. आकृत्या व नक्षी काढण्यासाठी काळ्या रंगाचा वापर केला आहे. ही भांडी भट्टीत पक्की भाजली जात. हडप्पा संस्कृतीतील लोक चांदी, तांबे या धातूंची भांडी बनवत असत.

**कापड उद्योग** : सूत कातणे, कापड विणणे, कापड रंगवणे हे उद्योग हडप्पा संस्कृतीच्या वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणावर चालत असत. ते लोकरीची वस्त्रे बनवत असत.

**व्यापार** : हडप्पा संस्कृतीच्या वसाहतीमध्ये तयार होणारा माल भारताबाहेर जात असे. सुमेरियन लिपीतील मजकूर असलेल्या मातीच्या विटा भारतात सापडल्या आहेत, तर हडप्पा संस्कृतीतील मुद्रा मेसोपोटेमिया येथे सापडल्या आहेत. यावरून या दोन्ही देशांत व्यापार चालत असावा. गुजरातमधील लोथल येथे मिळालेल्या हडप्पाकालीन गोदीच्या अवशेषांच्या आधारे या लोकांचा इतर देशांशी जलमार्गाने व्यापार चालत होता असे दिसते. सिंधू संस्कृतीच्या प्रदेशांतून पश्चिम आशिया आणि इजिप्त या प्रदेशांमध्ये कापड, सुगंधी द्रव्ये, विविध प्रकारचे मणी इत्यादी वस्तू निर्यात केल्या जात.

हडप्पा संस्कृती ही भरभराटीला आलेली संपन्न अशी नागरी संस्कृती होती. तिने भारतीय संस्कृतीचा पाया घातला.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.**

(अ) हडप्पाकालीन लोकांच्या अन्नातील ................ हा पदार्थ मुख्य घटक होता.

(तांदूळ, ज्वारी, बाजरी)

(आ) हडप्पाकालीन लोकांचे .......... आणि व्यापार हे प्रमुख व्यवसाय होते.

(पशुपालन, कुक्कुटपालन, शेती)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) हडप्पाकालीन स्त्री-पुरुष कोणते अलंकार वापरत?

(आ) हडप्पाकालीन मुलांच्या खेळण्यांतील कोणत्या खेळण्यांचे अवशेष सापडले आहेत?

(इ) हडप्पाकालीन लोक कोणती पिके घेत असत?

**३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) हडप्पाकालीन लोकांच्या अन्नात कोणकोणत्या पदार्थांचा समावेश होता?

(आ) हडप्पाकालीन मुद्रांविषयी माहिती लिहा.

उपक्रम

मातीची भांडी कशी तयार केली जातात याचे निरीक्षण करण्यासाठी शिक्षकांच्या मदतीने क्षेत्रभेट आयोजित करा.



# ६. वैदिक संस्कृती

भारताच्या वायव्य भागात आणि पंजाबच्या सुपीक प्रदेशात वैदिक संस्कृतीचा विकास झाला. वेद ग्रंथांची निर्मिती करणारे म्हणून त्यांच्या संस्कृतीला 'वैदिक संस्कृती' असे म्हणतात.

वैदिक संस्कृतीचे लक्षात येण्यासारखे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे वाङ्मय. इतके प्राचीन, विपुल आणि विविध प्रकारचे वाङ्मय इतरत्र क्वचितच पाहायला मिळते. फार प्राचीन काळापासून वैदिक काळातील लोकांनी संस्कृत भाषेत सुंदर अशी काव्यनिर्मिती केली.

ऋग्वेद हा त्यांचा पहिला ग्रंथ होय. ऋग्वेदानंतर यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे तीन वेद रचले गेले. त्यानंतरच्या काळात ब्राह्मणग्रंथ, आरण्यके आणि उपनिषदे यांची रचना झाली.

**ऋग्वेद** : ऋग्वेदात निसर्गातील विविध शक्तींना देवता मानून त्यांची स्तुती गाणारी कवने आहेत. त्यामध्ये केलेले निसर्गाचे वर्णन अतिशय काव्यमय आहे. ऋग्वेदातील प्रत्येक कडव्यास 'ऋचा' असे म्हणतात.

**यजुर्वेद** : यजुर्वेद हा यज्ञाविषयी माहिती देणारा ग्रंथ आहे. यज्ञात वापरायचे मंत्र आणि त्या मंत्रांची गद्यात केलेली स्पष्टीकरणे त्यात आढळतात.

**सामवेद** : ऋग्वेदातील काव्याचे तालासुरात गायन कसे करावे याचे मार्गदर्शन सामवेदात केलेले आहे. सामवेद हा भारतीय संगीताचा पाया मानला जातो.

**अथर्ववेद** : अथर्ववेदाचे स्वरूप वर उल्लेखलेल्या वेदांपेक्षा निराळे आहे. त्यात तत्त्वज्ञानाबरोबरच दैनंदिन जीवनातील अडचणी, संकटे , पीडा यांवर उपाय सांगितले आहेत. औषधी वनस्पतींची माहितीही अथर्ववेदात दिलेली आहे.

**ब्राह्मणग्रंथ** : ब्राह्मणग्रंथांची रचना ही यज्ञविधींमध्ये वेदांचा वापर कसा करावा, हे स्पष्ट करण्यासाठी झाली.

**आरण्यके** : आरण्यके म्हणजे अरण्यात जाऊन रचलेले ग्रंथ. दैनंदिन



पपायरस



भूर्जपत्र



शिलालेख





हडप्पाकालीन शिल्प

जीवनापासून दूर अरण्यात जाऊन चिंतन करण्याची परंपरा भारतात फार पूर्वीपासून चालत आली आहे. या परंपरेचा पाया आरण्यके रचणाऱ्या प्राचीन ऋषिमुनींनी घातला.

**उपनिषदे** : उपनिषद याचा अर्थ गुरूजवळ बसून मिळवलेले ज्ञान. असे ज्ञान 'उपनिषदे' या ग्रंथांमध्ये समाविष्ट केलेले आहे. सृष्टी कशी निर्माण झाली, ईश्वर म्हणजे काय इत्यादी अनेक गहन प्रश्नांवर त्यात चर्चा केलेली आहे.

या वाङ्मयातून आपल्याला वैदिक तत्त्वज्ञानाचा सखोल परिचय होतो. तसेच वैदिक काळातील समाजजीवनाचीही माहिती मिळते.

**आर्थिक जीवन** : गंगा-यमुनेच्या खोऱ्यात पसरलेल्या वैदिक काळातील या लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय होता. शेतकरी आपल्या उत्पादनाचा सहावा भाग राजाला कर म्हणून देत असत.

नंतरच्या काळात शेती करण्याचे तंत्र सुधारले. नांगरणीसाठी अनेक बैलांचा नांगर वापरला जाऊ लागला. शेतकरी एक किंवा दोन पिके घेत असत. त्यामध्ये सातू, गहू, कापूस, भात, मोहरी यांचा समावेश होता. कृषिउत्पादनाच्या वाढीबरोबरच व्यापाराचीही वाढ झाली. या काळात वस्तुविनिमयाची पद्धत रूढ होती. कृष्णल, मान व शतमान अशी वजने त्या काळी वापरात होती.

**व्यवसाय** : लोखंडाचा वापर या काळात वाढला. लोखंडाची विविध हत्यारे व अवजारे उपयोगात आणली जाऊ लागली. त्यामुळे शेती व इतर उत्पादनात वाढ झाली. रथकार, सुतार, कुंभार इत्यादी कारागीर त्याकाळच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे आणि समाजजीवनाचे आधारस्तंभ झाले. याच काळात एकाच व्यवसायातील कुशल कारागिरांनी एकत्र येऊन आपापल्या संघटना बनवल्या. अशा संघटनांना 'श्रेणी' असे म्हणत.

**राज्यव्यवस्था** : राजा हा राज्याचा प्रमुख असे. प्रजेचे रक्षण करणे, कर गोळा करणे व राज्याचा कारभार सुरळीत चालवणे ही राजाची मुख्य

कर्तव्ये होती. राजाच्या सत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी वैदिक काळात सभा आणि समिती अशा दोन संस्था होत्या. राज्यातील ज्येष्ठ व्यक्तींच्या मंडळास 'सभा' म्हणत, तर लोकांच्या सर्वसाधारण बैठकीस 'समिती' असे म्हणत.

आपल्या प्रदेशाचा कारभार सुरळीतपणे चालवण्यासाठी राजाच्या मदतीला विविध अधिकारी असत. 'ग्रामणी' हा गावाचा प्रमुख अधिकारी असे. 'ग्रामवादी' हा अधिकारी ग्रामणीच्या मदतीने न्यायनिवाडा करण्याचे काम पाही. अनेक ग्रामांच्या समूहाला 'विश्' असे म्हणत व त्यावरील अधिकाऱ्याला 'विश्पती' असे नाव होते. पुरोहित व सेनापती हे महत्त्वाचे अधिकारी होते. सैन्यात पायदळ व रथदळ असे विभाग असत. राज्यकारभारासाठी लागणारा पैसा करांच्या रूपाने गोळा केला जाई. कर गोळा करणाऱ्या अधिकाऱ्याला 'भागदुघ' असे म्हणत.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**
   (अ) यजुर्वेद हा ........... विषयी माहिती देणारा ग्रंथ आहे.
   (आ) सामवेद हा भारतीय ................. पाया मानला जातो.
   (इ) वैदिक काळातील लोकांचा ............हा प्रमुख व्यवसाय होता.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**
   (अ) 'ऋचा' म्हणजे काय?
   (आ) उपनिषदात कोणत्या प्रश्नांवर चर्चा केलेली आहे?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**
   (अ) अथर्ववेदात कोणती माहिती दिली आहे?
   (आ) राजाची प्रमुख कर्तव्ये कोणती होती?

**उपक्रम**

तुमच्या परिसरात कोणत्या औषधी वनस्पती आढळतात, त्यांची यादी करा.

# ७. वैदिक काळातील लोकजीवन

या पाठात आपण वैदिक काळातील लोकजीवनाबद्दल माहिती करून घेऊ.

**वर्णव्यवस्था :** या काळात समाजात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे वर्ण होते. हे वर्ण व्यवसायावरून ठरत. नंतरच्या काळात वर्ण जन्मावरून ठरू लागले. त्यामुळे जाती निर्माण झाल्या. जातिव्यवस्थेमुळे समाजात विषमता निर्माण झाली.

**कुटुंबव्यवस्था :** वैदिक काळातील समाज पितृप्रधान होता. कुटुंबातील ज्येष्ठ पुरुष हा कुटुंब प्रमुख असे. वैदिक काळातील समाज पितृप्रधान असल्यामुळे कुटुंबात स्त्रियांचे स्थान दुय्यम होते. मुलींना शिक्षण घेण्यास परवानगी होती. गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा इत्यादी काही विद्वान स्त्रियांचे उल्लेख प्राचीन वाङ्मयात आढळतात. मात्र अशा स्त्रियांचे प्रमाण फार थोडे होते.

नंतरच्या काळात समाजात स्त्रियांवरील बंधने अधिक कडक झाली. त्यामुळे स्त्रियांची स्थिती खालावली.

**आश्रमव्यवस्था :** जन्मापासून मृत्यूपर्यंत व्यक्तीच्या आयुष्याची केलेली आखणी म्हणजे आश्रमव्यवस्था होय. आयुष्याच्या पहिल्या भागात व्यक्तीने अभ्यास करून विद्या संपादन करायची असे. या काळास 'ब्रम्हचर्याश्रम' असे म्हणत. विद्यार्थिदशेत व्यक्तीने साधे व स्वावलंबी जीवन जगावे, गुरूंची आज्ञा पाळावी असा संकेत होता. विवाह करून संसार करण्याच्या काळास 'गृहस्थाश्रम' असे म्हणत. गृहस्थाश्रमाच्या काळात व्यक्तीने कुटुंबाचे पालनपोषण करावे, त्याचप्रमाणे धार्मिक व सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडाव्यात असे मानले जाई. कुटुंबाची

जबाबदारी मुलांकडे सोपवून निवृत्त होण्याची अवस्था म्हणजे 'वानप्रस्थाश्रम' होय. 'संन्यासाश्रम' हा आयुष्याचा अखेरचा म्हणजेच चौथा टप्पा. संन्यासाश्रमात व्यक्तीने चिंतनात जीवन कंठावे असे मानले जाई.

**दैनंदिन जीवन** : बहुतेक लोकांची घरे मातीची किंवा कुडाची असत. घराच्या भिंती व जमिनी मातीने आणि शेणाने सारवत. शहरातील घरे लाकडाची असत. काही घरे अनेक मजली असत.

लोकांच्या आहारात दूध, दही, तूप, मांस, फळे व धान्ये यांचा समावेश असे. रोजच्या जेवणात प्रामुख्याने सातू आणि तांदूळ यांचा वापर होई.

वैदिक काळातील लोक लोकरी आणि सुती वस्त्रे वापरीत. फुलांच्या माळा, सोन्याचे दागिने, वेगवेगळ्या प्रकारचे मणी व त्यांच्या माळा यांचा वापर करत. 'निष्क' हा गळ्यातील दागिना लोकप्रिय होता.

गायन, वादन, नृत्य, सोंगट्यांचा खेळ ही त्यांची मनोरंजनाची साधने होती. यज्ञप्रसंगी गायन व वादनाचे कार्यक्रम करत. वीणा, शततंतू, झांजा, शंख तसेच डमरू व मृदंग या वाद्यांचा ते वापर करत.

**धर्मकल्पना** : वैदिक काळातील लोकांना सूर्य, वारा, पाऊस, नद्या, वीज, वादळे यांसारख्या निसर्गातील अनेक शक्तींबद्दल कुतूहल वाटे. या शक्ती सतत प्रसन्न राहाव्यात म्हणून त्यांनी या शक्तींच्या प्रार्थना केल्या. त्यांनी प्रसन्न राहावे, म्हणून नैवेद्याची कल्पना रूढ केली. हा नैवेद्य त्या शक्तींपर्यंत पोहचवण्याचे काम अग्नी करतो, अशी त्यांची कल्पना होती. म्हणून ते अन्नपदार्थ अग्नीस अर्पण करू लागले. अग्नीत अर्पण केलेल्या नैवेद्यास 'हवि' असे म्हणत. अग्नीत हवि अर्पण करण्याची क्रिया म्हणजे यज्ञ. पुढील काळात यज्ञांचे तंत्र गुंतागुंतीचे झाले. त्यामुळे पुरोहिताच्या

मदतीशिवाय यज्ञ करणे अशक्य झाले. यज्ञ करणे म्हणजेच धर्माचे पालन, अशी कल्पना रूढ झाली. अशा रीतीने यज्ञाचे प्रस्थ वाढले.

निसर्गातील सर्व गोष्टी काही निश्चित नियमांप्रमाणेच घडतात. हे वैदिक काळातील लोकांनी जाणले होते. या नियमबद्धतेला ते 'ऋत' असे म्हणत.

सृष्टीची उत्पत्ती कशी झाली या प्रश्नाचे उत्तर शोधणाऱ्या ऋषिमुनींनी सगळी सृष्टी एकाच मूळ तत्त्वापासून निर्माण झाली, असे सांगितले. या तत्त्वाला त्यांनी 'सत्' असे म्हटले. कोणत्याही नावाने ईश्वराची उपासना केली तरी ती शेवटी या 'सत्' तत्त्वरूपी ईश्वराकडे पोचते असा त्या लोकांचा विश्वास होता. या विचारामुळे भारतात धार्मिक सहिष्णुता रुजण्यास मदत झाली.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) वैदिक काळातील समाज .......... होता.

(आ) वैदिक काळात ........... हा गळ्यातील दागिना लोकप्रिय होता.

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) प्राचीन वाङ्मयात कोणत्या विद्वान स्त्रियांचे उल्लेख आढळतात?

(आ) वैदिक काळातील लोकांच्या आहारात कोणत्या गोष्टींचा समावेश होता?

(इ) वैदिक काळातील लोक कोणत्या वाद्यांचा वापर करत?

(ई) 'हवि' म्हणजे काय?

**३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) 'ऋत' म्हणजे काय?

(आ) 'सत्' म्हणजे काय?

**उपक्रम**

विविध वाद्यांची चित्रे मिळवून त्यांची माहिती मिळवा.

# ८. नवे धार्मिक प्रवाह

भारतात वैदिक काळाच्या अखेरीस यज्ञयागातील कर्मकांडामुळे पुरोहितवर्गाचे वर्चस्व वाढले होते. त्यामुळे अंधश्रद्धा वाढली. अंधश्रद्धा कमी करण्याचा प्रयत्न चार्वाक, कपिल इत्यादी विचारवंतांनी केला.

याच काळात वर्णव्यवस्थेमुळे समाजात उच्च-नीच असा भेदभाव निर्माण झाला होता. हा भेद व्यक्तीच्या योग्यतेवर अवलंबून नव्हता, तर व्यक्तीच्या जातीवर अवलंबून होता. जाती-जातींमध्ये श्रेष्ठ व कनिष्ठ असा भेदभाव मानण्यात येऊ लागला. या सर्व परिस्थितीतून समाजाला योग्य मार्ग दाखवण्याचे काम वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांनी केले. त्यांचा उपदेश सामान्य माणसांना सहज समजणारा व आचरण्यास सोपा होता.

**वर्धमान महावीर** (इ.स.पू. ५९९ ते इ.स.पू. ५२७) : धर्माची तत्त्वे प्रकट करणाऱ्यास जैन धर्मात 'तीर्थंकर' असे म्हणतात. वर्धमान महावीर हे जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर होते. वर्धमान महावीर यांचा जन्म बिहार राज्यातील कुंडग्राम या ठिकाणी झाला. सर्व सुखांचा त्याग करून ज्ञानप्राप्तीसाठी ते भारतात फिरले. त्यांनी बारा वर्षे खडतर तपश्चर्या केली. त्यानंतर त्यांना ज्ञानप्राप्ती झाली. त्यांनी सर्व इंद्रियांवर विजय मिळवला, म्हणून लोक त्यांना 'जिन' म्हणजे जिंकणारा, असे म्हणू लागले.


वर्धमान महावीर

त्यानंतरचे आयुष्य त्यांनी धर्मप्रचार करण्यात घालवले. आपला उपदेश सर्वसामान्य लोकांना कळावा म्हणून त्यांनी 'अर्धमागधी' या लोकभाषेचा वापर केला.

**पंचमहाव्रते** : महावीरांनी अहिंसा हे सर्वश्रेष्ठ तत्त्व मानले. कोणत्याही प्रकारची हिंसा त्यांना मान्य नव्हती. महावीरांनी आपल्या अनुयायांना आचरणाचे जे नियम सांगितले त्यांना 'पंचमहाव्रते' म्हणतात.

१. **अहिंसा** : कोणत्याही जीवाची हिंसा करू नये.
२. **सत्य** : नेहमी खरे बोलावे व खरेपणाने वागावे.
३. **अस्तेय** : चोरी करू नये.
४. **अपरिग्रह** : कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेचा साठा करू नये.
५. **ब्रम्हचर्य** : आचरण शुद्ध ठेवावे.

**त्रिरत्ने** : सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान आणि सम्यक् चारित्र अशी तीन तत्त्वे महावीरांनी सांगितली. त्यांना 'त्रिरत्ने' असे म्हणतात.

१. **सम्यक् दर्शन** : महावीरांच्या तत्त्वज्ञानावर श्रद्धा ठेवणे.
२. **सम्यक् ज्ञान** : महावीरांच्या शिकवणीचे व जैन तत्त्वज्ञानाचे ज्ञान करून घेणे.
३. **सम्यक् चारित्र** : पंचमहाव्रतांनुसार आचरण करणे.

महावीरांना जाती-जातींतील भेदभाव मान्य नव्हता. व्यक्तीचे मोठेपण हे जातीवर अवलंबून नसते, तर उत्तम चारित्र्यावर अवलंबून असते, हे त्यांनी लोकांना पटवून दिले. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही तपश्चर्या करण्याचा, ज्ञान मिळवण्याचा आणि संन्यास घेण्याचा अधिकार आहे, असे महावीरांनी सांगितले. 'सर्व प्राणिमात्रांवर प्रेम करा, अंत:करणात दया व करुणा असू द्या, जगा आणि जगू द्या' असा त्यांनी लोकांना उपदेश केला.

**गौतम बुद्ध** (इ.स.पू. ५६३ ते इ.स.पू. ४८३) : गौतम बुद्धांचे नाव सिद्धार्थ होते. त्यांचा जन्म नेपाळमधील लुंबिनी येथे झाला. मानवी आयुष्यातील दुःखाचे मूळ काय, या विचाराने त्यांचे मन अस्वस्थ होत असे. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी घरादाराचा त्याग केला. बिहारमधील गया येथे पिंपळाच्या वृक्षाखाली ध्यानस्थ बसले असताना त्यांना दिव्य ज्ञानाची प्राप्ती झाली. ज्या वृक्षाखाली गौतम बुद्धांना दिव्य ज्ञानाची प्राप्ती झाली त्या वृक्षाला 'बोधिवृक्ष' असे म्हणतात. ज्ञान प्राप्त झाल्यानंतर वाराणसीजवळ सारनाथ येथे गौतम बुद्धांनी पहिले प्रवचन दिले. त्यास 'धम्मचक्कपवत्तन' (धर्मचक्रप्रवर्तन) असे म्हणतात. या प्रवचनात त्यांनी बौद्ध धर्माची मूलतत्त्वे सांगितलेली आहेत.



**गौतम बुद्ध**

मानवी जीवनाचे स्वरूप कसे असते? मानवाला दुःख का भोगावे लागते? या प्रश्नांची उत्तरे गौतम बुद्धांनी चार आर्यसत्यांच्या रूपाने मांडली आहेत.

**आर्यसत्ये** : मानवी जीवनातील सर्व व्यवहारांच्या मुळाशी चार सत्ये आहेत.

१. **दुःख** : मानवी जीवन हे दुःखमय आहे.

२. **तृष्णा** : मनुष्याच्या न संपणाऱ्या इच्छा हे दुःखाचे कारण असते.

३. **दुःख-निरोध** : दुःखाचा अंत करता येतो.

४. **प्रतिपद्** : दुःख निवारण्याचा मार्ग.

गौतम बुद्धांनी दुःख निवारण्यासाठी जो मार्ग सांगितला, त्याला 'अष्टांग मार्ग' असे म्हणतात. सम्यक् म्हणजे योग्य. सम्यक् दृष्टी, सम्यक् विचार, सम्यक् भाषण, सम्यक् कृती, सम्यक् उपजीविका, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती आणि सम्यक् समाधी हे अष्टांग मार्गाचे आठ भाग आहेत.

**पंचशील** : अष्टांग मार्गाबरोबर जे नियम पाळायचे त्यांना 'पंचशील' असे म्हणतात.

१. **अहिंसा** : हिंसा करू नये.

२. **सत्य** : खोटे बोलू नये.

३. **अस्तेय** : चोरी करू नये.

४. **इंद्रिय संयम** : सुखाच्या हव्यासावर नियंत्रण मिळवावे.

५. **मादक पदार्थांचे सेवन करू नये.**

**बौद्ध संघ** : गौतम बुद्धांनी आपले विचार लोकांपर्यंत पोचवण्यासाठी आपल्या अनुयायांना संघटित करून बौद्ध संघ स्थापन केला. जे अनुयायी बौद्ध संघात प्रवेश करत त्यांना 'भिक्खू' असे म्हणत. त्यांना आचरणाचे कडक नियम पाळावे लागत असत. बौद्ध संघामध्ये सर्व जातींतील लोकांना प्रवेश होता. त्यांनी स्त्रियांनाही संघात स्थान दिले. गौतम बुद्धांनी आपला उपदेश सर्वांपर्यंत पोचावा म्हणून 'पाली' या लोकभाषेचा वापर केला. त्यामुळे लोकांना त्यांची शिकवण आत्मसात करता आली.

'बहुजनहिताय, बहुजनसुखाय' हा बुद्धांच्या शिकवणीचा ठसा साऱ्या जगावर खोलवर उमटलेला आहे.

लोकांना उपदेश करण्यासाठी वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध स्वत: खेडोपाडी फिरले. 'मानवता श्रेष्ठ आहे. सर्व मानव सारखे आहेत.' हा संदेश त्यांनी सामान्य माणसांपर्यंत पोचवला. समाजाला कर्मकांडातून

मुक्त होण्याचा मार्ग सांगितला. या दोन महामानवांनी सांगितलेली तत्त्वे भारतीय संस्कृतीत खोलवर रुजली आहेत.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) धर्माची तत्त्वे प्रकट करणाऱ्यास जैन धर्मात .......... असे म्हणतात.

(आ) वर्धमान महावीर यांनी आपला उपदेश लोकांना कळावा, म्हणून .......... या लोकभाषेचा वापर केला.

(इ) गौतम बुद्धांना ज्या वृक्षाखाली दिव्य ज्ञानाची प्राप्ती झाली, त्या वृक्षाला .......... असे म्हणतात.

(ई) गौतम बुद्धांनी आपला उपदेश सर्वांपर्यंत पोचावा, म्हणून .......... या लोकभाषेचा वापर केला.

२. **'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) अहिंसा | (१) नेहमी खरे बोलावे. |
| (आ) सत्य | (२) चोरी करू नये. |
| (इ) अस्तेय | (३) कोणत्याही जीवाची हिंसा करू नये. |
| | (४) मालमत्तेचा साठा करू नये. |

३. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) वर्धमान महावीर यांना लोक 'जिन' का म्हणू लागले?

(आ) अष्टांग मार्गाबरोबर जे नियम पाळायचे त्याला काय म्हणतात?

४. **तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) वर्धमान महावीरांनी लोकांना कोणता उपदेश केला?

(आ) बौद्ध संघाविषयी माहिती लिहा.

**उपक्रम**

वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांची चरित्रे वाचा.


# ९. महाजनपदे

इसवी सन पूर्व सहाव्या शतकाच्या सुरुवातीला उत्तर भारतात अनेक राज्ये होती. त्यांना 'जनपदे' आणि 'महाजनपदे' असे म्हणत. त्यांतील काही महाजनपदांमध्ये 'राजेशाही' होती. त्यापैकी कोसल, वत्स, अवंती आणि मगध ही महत्त्वाची होती.

काही महाजनपदांमध्ये ज्येष्ठ व जबाबदार नागरिकांची एक 'गणपरिषद' असे. राज्यातील सर्वोच्च अधिकार गणपरिषदेकडे असत. राज्यकारभाराचे अधिकार या परिषदेकडे असले, तरी प्रत्यक्ष दैनंदिन प्रशासनासाठी कार्यकारी मंडळ असे. सभासद प्रस्ताव मांडत, त्यावर चर्चा होत असे. निर्णय बहुमताने घेतले जात असत.

**कोसल** : हिमालयाच्या पायथ्याशी म्हणजेच नेपाळ व उत्तर प्रदेशाच्या काही भागांत 'कोसल' राज्य होते. साकेत ही या राज्याची राजधानी होती. या राज्यातील श्रावस्ती आणि कुशावती ही नगरे प्रसिद्‌ध होती. कोसलचा राजा प्रसेनजित हा गौतम बुद्‌धांचा समकालीन होता. तो कुशल सेनानी व पराक्रमी होता. प्रसेनजित या राजाच्या कारकिर्दीत कोसल व मगध यांच्यात युद्‌ध झाले. त्यानंतर कोसल मगध राज्यात विलीन झाले.

**वत्स** : आजच्या अलाहाबादजवळील कौशांबी ही वत्स राज्याची राजधानी होती. या राज्याच्या राजांपैकी उदयन हा एक पराक्रमी राजा होता. या राजाची माहिती बौद्‌ध वाङ्‌मयात व संस्कृत नाटककार भास याच्या नाटकांतून मिळते. या राज्यात तयार होणारे तलम कापड फार प्रसिद्‌ध होते. राजा उदयनानंतर वत्स राज्याचे स्वतंत्र अस्तित्व फार काळ टिकू शकले नाही.




The territorial waters of India extends into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. Based upon survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright, 1999.

**अवंती :** प्रद्योत हा अवंतीच्या राजांपैकी एक महत्त्वाचा राजा होता. आजच्या मध्यप्रदेशातील 'उज्जयिनी' ही त्याची राजधानी होती. हे शहर प्रसिद्ध व्यापारी केंद्रही होते. अवंतीचे राज्य मगध राज्यात विलीन झाले.

**मगध** : बिहारच्या परिसरातील गंगा व शोण नदीच्या खोऱ्यात मगध हे राज्य पसरले होते. बिंबिसार या राजाच्या काळात मगधाचा राज्यविस्तार होण्यास सुरुवात झाली. त्याने काशी, अंग, मद्र, अवंती, कोसल ही राज्ये आपल्या राज्यास जोडली. 'राजगृह' म्हणजेच आजच्या बिहारमधील 'राजगीर' ही मगधची राजधानी होती. महागोविंद या वास्तुविशारदाने हे शहर आणि बिंबिसारचा राजवाडा बांधला होता. बिंबिसारच्या दरबारात जीवक हा प्रसिद्‌ध वैद्य होता.

बिंबिसारचा मुलगा अजातशत्रू याने राज्यविस्ताराची मोहीम पुढे चालवली. त्याने पूर्वेकडील अनेक गणराज्ये जिंकून घेतली. अजातशत्रूच्या काळात मगधची भरभराट झाली. त्याने जैन व बौद्‌ध धर्मांना राजाश्रय दिला. तो गौतम बुद्‌धांचा समकालीन होता. त्याने बौद्‌ध धर्माचा स्वीकार करून त्याच्या प्रसारासाठी प्रयत्न केले. बौद्‌ध धर्माची पहिली परिषद अजातशत्रूने राजगृह या ठिकाणी भरवली.

अजातशत्रूनंतरच्या राजांमध्ये शिशुनाग हा मगधचा उल्लेखनीय राजा होता. त्याने अवंती, कोसल व वत्स ही राज्ये आपल्या राज्यास जोडली. त्याच्या काळात जवळजवळ सर्व उत्तर भारत मगधच्या वर्चस्वाखाली आला.

**मगधचे नंद राजे** : इसवी सन पूर्व ३६४ ते इसवी सन पूर्व ३२४ या काळात मगधच्या गादीवर नंद राजे राज्य करत होते. प्राचीन भारताच्या इतिहासातील हे पहिले साम्राज्य होते. या साम्राज्याचा विस्तार तक्षशिला, पंजाब, कर्नाटक, बंगाल, बिहार ते हिमालयापर्यंत होता. नंद घराण्याच्या शेवटच्या राजाचे नाव धनानंद होते. तो धनलोभी व जुलमी असल्याने प्रजेत असंतोष होता. चंद्रगुप्त मौर्य या महत्त्वाकांक्षी तरुणाने मगधवर स्वारी करून नंद राजवटीचा शेवट केला.

नंद राजांनी आपल्या विस्तृत राज्याला आवश्यक अशी शासनव्यवस्था निर्माण केली होती. ही शासनव्यवस्था मौर्य काळातही चालू राहिली. नंद राजांकडे चतुरंग सैन्य म्हणजे पायदळ, घोडदळ, हत्तीदळ व रथदळ होते.

**परकीय आक्रमणे :** मगध साम्राज्याच्या उदयाच्या वेळी इराणचा सम्राट दार्युश याने भारताच्या वायव्येकडील गांधार व सिंध या प्रदेशांवर आक्रमण केले आणि ते प्रदेश जिंकले. त्यामुळे भारत व इराण यांच्यात राजनैतिक संबंध निर्माण झाले. त्यातून व्यापार आणि कलेच्या क्षेत्रात देवाणघेवाण सुरू झाली.

**सिकंदरची स्वारी :** ग्रीक राजा अलेक्झांडर ऊर्फ सिकंदर याने इराणच्या साम्राज्याचा पाडाव केला. नंतर त्याने भारतावर स्वारी केली. सिंधू नदी ओलांडून सिकंदर तक्षशिलेस आला. या मार्गावर काही स्थानिक भारतीय राजांनी त्याच्याशी निकराचा लढा दिला.



सिकंदर

दरम्यानच्या काळात सिकंदरच्या सैनिकांना अतोनात हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या होत्या. भारतीय सैन्याच्या कडव्या प्रतिकाराला त्यांना तोंड द्यावे लागले. स्वदेशापासून ते खूप दूर आले होते. मायदेशी परत जाण्याची त्यांची इच्छा होती. त्यांनी सिकंदरविरुद्ध बंड पुकारले. जिंकलेल्या प्रदेशातूनही उठाव होऊ लागल्याच्या बातम्या सिकंदरच्या कानावर येऊ लागल्या. जिंकलेल्या भारतीय प्रदेशांची व्यवस्था आपल्या अधिकाऱ्यांवर सोपवून सिकंदर भारतातून माघारी फिरला. वाटेत बाबिलोन येथे इसवी सन पूर्व ३२३ मध्ये सिकंदर मरण पावला.

**भारत-ग्रीस संबंध :** सिकंदरच्या स्वारीनंतर भारत व ग्रीस या देशांतील दळणवळण वाढले. व्यापारवाढीला चालना मिळाली. ग्रीकांच्या शिल्पकलेचा भारतीय शिल्पकलेवर प्रभाव पडला. त्यातून निर्माण झालेल्या शैलीला 'गांधार शिल्पशैली' असे म्हणतात. ग्रीकांची नाणी वैशिष्ट्यपूर्ण



ग्रीक नाणे

होती. त्यावर एका बाजूला राजाचे आणि दुसऱ्या बाजूला एखाद्या देवतेचे चित्र असे. नाण्यावर त्या राजाचे नावही लिहिलेले असे. अशी नाणी तयार करण्याची कल्पना भारतीयांनी ग्रीकांपासून घेतली. भारत व भारताच्या पश्चिमेकडील देश यांच्यामधील व्यापाराला चालना मिळाली.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) महाजनपदांमध्ये ज्येष्ठ व जबाबदार नागरिकांची एक .......... असे.

(आ) अजातशत्रू याने बौद्ध धर्माची पहिली परिषद .......... या ठिकाणी भरवली.

(इ) वैशिष्ट्यपूर्ण नाणी तयार करण्याची कल्पना भारतीयांनी .......... पासून घेतली.

२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) महागोविंद | (१) कोसलचा राजा |
| (आ) जीवक | (२) वास्तुविशारद |
| (इ) प्रसेनजित | (३) मगधचा राजा |
| | (४) वैद्य |

३. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कोणती महाजनपदे महत्त्वाची होती?

(आ) चतुरंग सैन्य म्हणजे काय?

४. **तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) अजातशत्रूच्या कामगिरीची माहिती लिहा.

(आ) सिकंदरच्या स्वारीचे भारतावर कोणते परिणाम झाले?

**उपक्रम**


नाण्यांचा संग्रह करा व शिक्षकांच्या मदतीने शाळेच्या स्नेहसंमेलनात त्यांचे प्रदर्शन आयोजित करा.

**सोळा महाजनपदे :** १. काशी (बनारस), २. कोसल (लखनौ), ३. मल्ल (गोरखपूर), ४. वत्स (अलाहाबाद), ५. चेदि (कानपूर), ६. कुरू (दिल्ली), ७. पांचाल (रोहिलखंड), ८. मत्स्य (जयपूर), ९. शूरसेन (मथुरा), १०. अश्मक (औरंगाबाद - महाराष्ट्र), ११. अवंती (उज्जैन), १२. अंग (चंपा - पूर्व बिहार), १३. मगध (दक्षिण बिहार), १४.वृज्जी (उत्तर बिहार), १५. गांधार (पेशावर), १६. कंबोज (गांधारजवळ).

**गांधार शिल्पशैली :** तक्षशिलेच्या आसपासच्या प्रदेशात गांधार शैली विकसित झाली. ग्रीक कलाशैलीचा प्रभाव भारतीय शिल्पशैलीवर पडून ही नवीन शैली रूढ झाली. वास्तवता, बांधेसूदपणा व दगडातील नाजूक कोरीवकाम ही या शैलीची वैशिष्ट्ये होती. गौतम बुद्धांच्या अनेक प्रतिमा या शैलीत शिल्पित केलेल्या आहेत.



प्राचीन गुहाचित्र



हडप्पा संस्कृती - मातीची खेळणी



अजिंठा लेण्यातील चित्र

# १०. मौर्यकालीन भारत

भारताच्या इतिहासात मौर्यांचा कालखंड महत्त्वाचा आहे. मौर्य काळात भारतात एकछत्री साम्राज्याची स्थापना होऊन स्थिर शासन निर्माण झाले.

सिकंदरच्या मृत्यूनंतर ग्रीक अधिकाऱ्यांनी आपापल्या ताब्यातील प्रदेशात स्वतंत्र राज्यांची घोषणा केली. त्यांच्यात सत्ता स्पर्धा सुरू झाली. ग्रीक सत्तेखालील भारतीय प्रदेशात ग्रीकांविरुद्‌ध उठाव सुरू झाले. त्या प्रदेशातील भारतीय राजांना एकत्र करून चंद्रगुप्त मौर्याने ग्रीकांशी युद्‌ध केले. चंद्रगुप्त मौर्याने ग्रीकांचा पराभव करून भारताच्या वायव्य भागात शांतता निर्माण केली.

**चंद्रगुप्त मौर्य :** चंद्रगुप्त मौर्य हा मौर्य साम्राज्याचा संस्थापक होय. मगधचा राजा धनानंद याच्या जुलमी सत्तेचा चंद्रगुप्ताने पाडाव केला. मगधवर सत्ता प्रस्थापित केली. मध्यप्रदेशातील अवंती व पश्चिमेकडील सौराष्ट्रापर्यंत त्याची सत्ता होती.

आजच्या बिहारमधील पाटणा म्हणजेच 'पाटलिपुत्र' ही त्याची राजधानी होती. बाबिलोनचा ग्रीक राजा सेल्यूकस निकेटर याने भारतावर स्वारी केली. त्या वेळी चंद्रगुप्ताने त्याचा पराभव केला. त्यामुळे काबूल, हेरात, कंदाहार हे प्रदेश मौर्य साम्राज्यात समाविष्ट झाले. सेल्यूकस निकेटरने मेगॅस्थनिस हा आपला राजदूत चंद्रगुप्ताच्या दरबारी पाठवला होता. मेगॅस्थनिसने तत्कालीन भारताचे वर्णन लिहून ठेवले आहे.

चंद्रगुप्ताने आयुष्याच्या शेवटच्या काळात राजपदाचा त्याग केला. त्याने जैन धर्म स्वीकारला होता असे मानले जाते. तो म्हैसूरजवळ श्रवणबेळगोळ येथे जाऊन राहिला. तेथेच त्याचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा बिंदुसार हा मगधचा राजा झाला. बिंदुसारनंतर

त्याचा मुलगा अशोक इ.स.पू. २७३ च्या सुमारास मगधचा राजा झाला.


**सम्राट अशोक :** अशोक तक्षशिला व उज्जयिनी या प्रदेशांचा राज्यपाल होता. तक्षशिला येथे झालेले बंड त्याने मोडून काढले.




The territorial waters of India extends into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. Based upon survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright, 1999.

अशोकाच्या लेखांमध्ये त्याने 'देवानाम् प्रिय, प्रियदर्शी राजा' अशी पदवी धारण केलेली दिसते. अशोकाचे साम्राज्य पूर्वेस बंगालचा उपसागर, दक्षिणेस नेल्लोर, पश्चिमेस अरबी समुद्र, वायव्येस काबूल नदी व उत्तरेस नेपाळ अशा विस्तृत प्रदेशांत पसरले होते.

**कलिंगचे युद्ध** : आपले साम्राज्य वाढवण्याच्या हेतूने अशोकाने कलिंगवर स्वारी केली. या युद्धात अशोकाला विजय मिळाला; परंतु त्यात झालेला भयंकर रक्तपात बघून यापुढे कधीही युद्ध न करण्याचा त्याने निर्णय घेतला.


अशोकस्तंभ - लौरिया नंदनगढ

युद्धापेक्षा प्रेम श्रेष्ठ आहे, हे सम्राट अशोकाला पटले. आपला उपदेश लोकांपर्यंत पोचवण्यासाठी सम्राट अशोकाने आपल्या राज्यात जागोजागी स्तंभ उभारले, शिलालेख कोरले. त्याचा सदाचारावर भर होता. सत्य, अहिंसा, भूतदया व करुणा ही तत्त्वे माणसाने आचरणात आणावीत, वडीलधाऱ्यांचा मान ठेवावा असा त्याचा आग्रह होता.

**धर्मप्रसार** : बौद्ध धर्मातील तत्त्वांचा विचार करण्यासाठी अशोकाने पाटलिपुत्र येथे एक धर्म महासभा भरवली. या सभेत

बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी योजना आखण्यात आली. त्यासाठी सम्राट अशोकाने भारताबाहेर इतर देशांत बौद्ध धर्मोपदेशक पाठवले. त्याने आपला मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा यांना बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी श्रीलंकेस पाठवले. सम्राट अशोकाला सर्व धर्मांविषयी आदर होता.

**लोकोपयोगी कामे** : प्रजेच्या सुखासाठी व कल्याणासाठी सम्राट अशोकाने अनेक कामे केली. माणसांना तसेच पशूंना मोफत औषधपाणी मिळावे म्हणून दवाखाने काढले. अनेक उपयोगी अशा औषधी वनस्पतींची लागवड केली. रस्ते बांधले, वाटसरूंची सोय व्हावी म्हणून धर्मशाळा बांधल्या. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झाडे लावली. वाटसरूंसाठी पाणपोयांची व्यवस्था केली. अनेक विहिरी खोदल्या.

**मौर्यकालीन राज्यव्यवस्था** : प्रजेचे रक्षण करणे व न्यायदान करणे ही राजाची प्रमुख कर्तव्ये होती.

राज्यकारभाराच्या सोईसाठी साम्राज्याची सहा विभागांत विभागणी केली होती. राज्यकारभारात राजाला सल्ला देण्यासाठी जे मंडळ होते त्याला 'मंत्रिपरिषद' म्हणत. राज्यकारभार चालवण्यासाठी अधिकारी नेमलेले असत. जिल्ह्याच्या अधिकाऱ्याला 'रज्जुक' म्हणत. तालुक्याच्या अधिकाऱ्याला 'गोप' म्हणत, तर खेड्याच्या प्रमुखाला 'ग्रामणी' म्हणत. 'मंत्रिपरिषद' आणि अधिकाऱ्यांच्या मदतीसाठी कार्यक्षम हेरखाते होते.

**मौर्यकालीन लोकजीवन** : मौर्य काळात लोकजीवन कृषिप्रधान होते. शेतीबरोबर इतर उद्योगधंदेही भरभराटीला आले होते. या काळात चकाकी असलेली मातीची भांडी मोठ्या प्रमाणावर बनवली जात असत. तसेच नौकाबांधणी हा एक मोठा उद्योग होता. विविध व्यावसायिकांचे त्याचप्रमाणे व्यापाऱ्यांचेही संघ होते. त्यांना 'श्रेणी' म्हणत.

लोकांच्या मनोरंजनासाठी अनेक उत्सव व समारंभ होत असत. नृत्य, गायन, तसेच कुस्त्या असे विविध कार्यक्रम होत असत. सोंगट्यांचा खेळ लोकप्रिय होता. बुद्धिबळाचा खेळही ते खेळत असत.

**कला व साहित्य** : या काळात शिल्पकला आणि वास्तुकला यांत खूप प्रगती झाली होती. सम्राट अशोकाच्या काळात शिल्पकला विकसित झाली. त्याने अनेक स्तंभ उभारले, स्तूप आणि विहार बांधले. सारनाथ येथे सम्राट अशोकाने उभारलेल्या स्तंभावरील धर्मचक्र आज भारताच्या राष्ट्रध्वजावर झळकत आहे.



स्तंभशीर्ष - सारनाथ

मौर्य काळात संस्कृतबरोबर पाली, अर्धमागधी इत्यादी प्राकृत भाषा प्रचलित होत्या. पाणिनीचे 'अष्टाध्यायी' आणि चाणक्याचे 'अर्थशास्त्र' हे या काळातील प्रसिद्ध ग्रंथ आहेत. याच काळात 'तिपिटक' (त्रिपिटक) या पाली भाषेतील बौद्ध ग्रंथाची रचना पूर्ण झाली. तिपिटकातील 'थेरीगाथा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या रचना बौद्ध संघातील स्त्रियांनी केलेल्या आहेत. गौतम बुद्धांच्या जीवनावर आधारलेल्या 'जातक कथा' याच काळात लिहिल्या गेल्या.

मौर्य सम्राटांनी भारतीय कलांना उदार आश्रय दिला. त्यांनी भारतीय संस्कृती व कला या क्षेत्रात एक नवे दालन उघडले.

## स्वाध्याय

१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(अ) सेल्यूकस निकेटर याने ............. हा आपला राजदूत चंद्रगुप्ताच्या दरबारी पाठवला.

(आ) मौर्य साम्राज्याचा .......... हा संस्थापक होय.

(इ) सम्राट अशोकाने ......... येथे एक धर्म महासभा भरवली.

२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) रज्जुक | (१) तालुक्याचा अधिकारी |
| (आ) गोप | (२) खेड्याचा प्रमुख |
| (इ) ग्रामणी | (३) जिल्ह्याचा अधिकारी |
| | (४) राजाला सल्ला देणारा |

३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) अशोकाने कोणती पदवी धारण केली?

(आ) 'श्रेणी' म्हणजे काय?

(इ) मौर्य काळात कोणत्या भाषा प्रचलित होत्या?

४. तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) सम्राट अशोकाने आपला उपदेश लोकांपर्यंत पोचवण्यासाठी काय केले?

(आ) सम्राट अशोकाने कोणती लोकोपयोगी कामे केली?

**उपक्रम**

तुमच्या परिसरातील स्तूप, लेणी, मंदिरे यांना भेटी द्या. ती कोणत्या काळातील आहेत याची माहिती मिळवा.

**पाणिनी :** पाणिनी हा संस्कृत भाषेचा सर्वश्रेष्ठ व्याकरणकार होता. 'अष्टाध्यायी' हा त्याचा व्याकरणावरील प्रसिद्ध ग्रंथ होय. हा ग्रंथ आठ अध्यायांत विभागलेला आहे. गणितातील सूत्रांप्रमाणे त्याने व्याकरणाचे नियम तांत्रिक परिभाषेत दिले आहेत.

**अर्थशास्त्र** : अर्थशास्त्र हा ग्रंथ चाणक्य ऊर्फ कौटिल्य याने लिहिला. या ग्रंथात राजाचे कर्तव्य, मंत्री निवडण्यासाठीचे निकष, संरक्षणाची व्यवस्था, दुर्गाचे प्रकार, सैन्याची रचना, गुप्तहेरांची योजना, खजिन्याची व दप्तरखान्याची व्यवस्था, न्यायदान पद्धती, चोरीचा तपास, शिक्षेचे प्रकार इत्यादी प्रशासनविषयक बाबींची सूक्ष्मपणे चर्चा केलेली आहे.

**तिपिटक (त्रिपिटक) ग्रंथ** : बौद्ध धर्मग्रंथांपैकी पाली भाषेत असलेले ग्रंथ. तीन पेट्यांत किंवा विभागांत संग्रहित केलेले ग्रंथ म्हणून त्यांना 'त्रिपिटक' हे नाव पडले. ते तीन विभाग असे- **(१) विनयपिटक** : यात पाच ग्रंथ असून त्यात बौद्ध संघाच्या व्यवस्थेचे नियम दिलेले आहेत. **(२) सुत्तपिटक** : यातही पाच ग्रंथ असून गौतम बुद्धांचा सामान्य उपदेश संग्रहित केला आहे. **(३) अभिधम्मपिटक** : हे एकूण सात ग्रंथ असून बौद्ध तत्त्वज्ञानाचे वैज्ञानिक पद्धतीने केलेले विवेचन त्यात आहे.

**थेरीगाथा** : थेरी म्हणजे अनुभवी व ज्ञानी स्त्री. थेरीगाथा या बौद्धधर्मीय ग्रंथात ७३ विद्वान स्त्रियांनी रचलेल्या ५२२ गाथांचा संग्रह केलेला आहे. पाली भाषेतील या गाथा काव्यरूपात असून त्यांत उत्कट भावनांचा परिपोष आढळतो.

# ११. उत्तरेकडील प्राचीन राज्ये

उत्तर भारतात अनेक राजघराणी उदयाला आली. त्यांपैकी इंडो-ग्रीक, कुशाण, गुप्त व वर्धन या घराण्यांची कारकीर्द भारताच्या इतिहासात महत्त्वाची आहे. त्यांची माहिती या पाठात घेऊ.

सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर मौर्य साम्राज्याचा ऱ्हास सुरू झाला. अशोकानंतरचे राजे कर्तृत्ववान नसल्याने शेवटचा राजा बृहद्रथ याचा पराभव करून शुंग घराणे सत्तेवर आले. पुष्यमित्र शुंग हा राजा झाला. त्या वेळेस भारतात वायव्य भागात ग्रीकांनी स्वतंत्र राज्ये स्थापन केली होती.

**इंडो-ग्रीक सत्ता :** भारताच्या वायव्येकडील प्रदेशात राज्य करणारे हे ग्रीक राजे 'इंडो-ग्रीक' म्हणून ओळखले जातात. मिनँडर या राजाचा उल्लेख भारतीय ग्रंथात 'मिलिंद' असा केलेला आहे. मिनँडरचे राज्य हिंदुकुश पर्वत, काश्मीर, बुंदेलखंडापर्यंत पसरले होते. त्याने 'नागसेन' या बौद्‌ध भिक्खूबरोबर बौद्‌ध तत्त्वज्ञानावर चर्चा केली. यातून 'मिलिंद पन्ह' या प्रश्नोत्तररूपी संवाद ग्रंथाची निर्मिती झाली. 'मिलिंद पन्ह' म्हणजे मिलिंदाचे प्रश्न.


इंडो-ग्रीकांनंतर वायव्य भारतात शक-पहलव या मध्य आशियातील टोळ्यांनी स्वाऱ्या केल्या. वायव्य व पश्चिम भारतात त्यांनी आपली छोटी छोटी राज्ये स्थापन केली. शक-पहलव भारतीय संस्कृतीत मिसळून गेले.

**कुशाण राजसत्ता :** शक-पहलवांनंतर इसवी सनाच्या पहिल्या शतकात 'कुशाण' भारतात आले.

**सम्राट कनिष्क :** कनिष्क हा कुशाणांचा प्रसिद्‌ध राजा होता. त्याचे साम्राज्य पश्चिमेला काबूलपासून पूर्वेला वाराणसीपर्यंत पसरले होते. त्याची सोन्याची आणि तांब्याची नाणी उत्तर भारतात सर्वत्र सापडली आहेत.

कनिष्काच्या काळात बौद्ध धर्माची चौथी परिषद काश्मीरमध्ये भरली होती.

**गुप्त राजसत्ता :** इ. स. ३२० ते इ.स. ६०० या काळात उत्तर भारतात गुप्त साम्राज्य होते.




The territorial waters of India extends into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. Based upon survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright, 1999.

**समुद्रगुप्त :** श्रीगुप्त हा गुप्त घराण्याचा संस्थापक होता. गुप्त घराण्यांची सत्ता पहिल्या चंद्रगुप्ताच्या कारकिर्दीत प्रबळ झाली. त्याने गुप्त साम्राज्याचा पाया घातला. पहिल्या चंद्रगुप्तानंतर समुद्रगुप्त सत्तेवर आला. समुद्रगुप्ताने आसपासच्या लहान राजांचा पराभव केला. त्याचे राज्य आसामपासून पंजाबपर्यंत पसरले होते. त्याने कांचीपर्यंतचा पूर्व किनारपट्टीचा प्रदेशही जिंकला होता. समुद्रगुप्ताच्या वाढत्या सामर्थ्यामुळे वायव्य सरहद्दीवरील राजे व श्रीलंकेतील राजांनी समुद्रगुप्ताशी मैत्री करार केले.



गुप्तकालीन नाणे

समुद्रगुप्ताच्या दिग्विजयाचे वर्णन अलाहाबाद येथील एका शिलालेखात सापडते. तो विद्या व कलांचा भोक्ता आणि संगीतप्रेमी होता, हे त्याच्या सोन्याच्या नाण्यांवरून समजते.

**दुसरा चंद्रगुप्त :** समुद्रगुप्तानंतर त्याचा मुलगा दुसरा चंद्रगुप्त सत्तेवर आला. वायव्येकडील अनेक राज्ये त्याने जिंकून घेतली. शकांचा 'अरि' म्हणजे शत्रू, म्हणून त्याला 'शकारी' असे म्हणत. गुप्तांचे साम्राज्य त्याने वायव्येकडे वाढवले. माळवा, गुजरात व सौराष्ट्र हे पश्चिमेकडील प्रदेशही त्याने आपल्या साम्राज्याला जोडले. दक्षिणेतील सामर्थ्यशाली वाकाटक घराण्यात आपल्या मुलीचा विवाह करून देऊन त्याने नातेसंबंध प्रस्थापित केले.

दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात 'फाहियान' हा चिनी प्रवासी भारतात आला होता. त्याने आपले प्रवासवर्णन लिहून ठेवले आहे.

**वर्धन राजसत्ता :** गुप्त सत्तेच्या उतरत्या काळात म्हणजे इसवी सनाच्या सहाव्या शतकात भारतातील वायव्येकडील प्रदेशात वर्धन राजसत्ता उदयाला आली.

**सम्राट हर्षवर्धन :** या घराण्यातील हर्षवर्धन हा महत्त्वाचा राजा होता. त्याने आपला राज्यविस्तार उत्तरेस नेपाळ, दक्षिणेस नर्मदा, पूर्वेस आसाम आणि पश्चिमेस माळव्यापर्यंत केला. त्याचे लष्करी सामर्थ्यही बरेच होते. त्याच्या पदरी पाऊण लाखापेक्षा जास्त फौज होती. त्याने आपला राजदूत चीनला पाठवला होता. आपल्या राज्यात सुव्यवस्था व शांतता राहावी म्हणून तो स्वत: राज्यभर फिरून देखरेख ठेवत असे. कनौज ही सम्राट हर्षवर्धनाच्या साम्राज्याची राजधानी होती.


युआन श्वांग

सम्राट हर्षवर्धन हा बौद्‌ध धर्माचा अनुयायी होता. त्याच्या काळात युआन श्वांग हा विद्‌वान बौद्‌ध भिक्खू चीनहून भारतात आला होता. हर्षवर्धन विद्‌वानांचा आश्रयदाता होता. तो स्वत:ही कवी व नाटककार होता. त्याने 'रत्नावली' व 'नागानंद' ही नाटके लिहिली. हर्षवर्धनाने प्रजेच्या सोईसाठी सार्वजनिक दवाखाने व धर्मशाळा बांधल्या. पाणपोया सुरू केल्या. राज्याच्या उत्पन्नाचा मोठा वाटा तो सार्वजनिक हितासाठी वापरत असे. दर

पाच वर्षांनी हर्षवर्धन आपली संपत्ती लोकांना वाटून टाकत असे. प्रजाहितदक्ष व दानशूर राजा म्हणून हर्षवर्धन इतिहासात प्रसिद्ध आहे.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) मिनँडर या राजाचा उल्लेख भारतीय ग्रंथात .......... असा केलेला आहे.

(आ) कनिष्क हा ............... प्रसिद्ध राजा होता.

(इ) दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात .......... हा चिनी प्रवासी भारतात आला होता.

(ई) हर्षवर्धन याने 'रत्नावली' व ............... ही नाटके लिहिली.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) 'मिलिंद पन्ह' म्हणजे काय?

(आ) समुद्रगुप्ताच्या दिग्विजयाचे वर्णन कोणत्या शिलालेखात सापडते?

३. **कारणे लिहा.**

(अ) दुसऱ्या चंद्रगुप्ताला 'शकारी' असे म्हणत.

(आ) सम्राट हर्षवर्धन प्रजाहितदक्ष व दानशूर राजा म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे.

**उपक्रम**

वेगवेगळ्या नाण्यांची चित्रे मिळवा व ती वहीत चिकटवा.

**फाहियान :** फाहियान हा विद्वान चिनी बौद्ध भिक्खू गुप्तांच्या काळात बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी भारतात आला. १४ वर्षे तो भारतात राहिला. त्या काळात त्याने गांधार, तक्षशिला, पेशावर, मथुरा, कनौज, श्रावस्ती, कपिलवस्तु, कुशीनगर, वैशाली इत्यादी ठिकाणांना भेटी दिल्या. पाटलिपुत्र येथे तीन वर्षे राहून त्याने संस्कृतचे अध्ययन केले.

**युआन श्वांग :** प्रसिद्ध चिनी प्रवासी व विद्वान बौद्ध भिक्खू. त्याने १५ वर्षे भारतात वास्तव्य केले. नालंदा विद्यापीठात संस्कृत भाषेचा व बौद्ध तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला. चीनला परत जाताना त्याने सुमारे साडेसहाशे ग्रंथ व भगवान बुद्धांच्या अनेक मूर्ती आपल्याबरोबर नेल्या. युआन श्वांगच्या प्रवासवर्णनात तत्कालीन भारताची विपुल माहिती मिळते.



**कनिष्काचे नाणे**


वर दर्शवलेले सोन्याचे नाणे कुशाण सम्राट कनिष्काने पाडलेले होते. या नाण्याच्या दर्शनी बाजूवर सम्राट कनिष्काची प्रतिमा आहे. प्रतिमेच्या बाजूने ग्रीक लिपीत लिहिलेला 'शाओ नानो शाओ कनेष्की कोशानो' असा लेख आहे. याचा अर्थ 'राजाधिराज कनिष्क कुशाण' असा आहे. नाण्याच्या मागील बाजूस गौतम बुद्धाची प्रतिमा आहे आणि बाजूला ग्रीक लिपीत 'बोद्दो' म्हणजे बुद्ध असे लिहिले आहे.

# १२. दक्षिणेकडील प्राचीन राज्ये

उत्तर भारताप्रमाणेच दक्षिण भारतातही अनेक राजघराणी उदयाला आली. त्यांपैकी सातवाहन, वाकाटक, चालुक्य व पल्लव या घराण्यांची कारकीर्द भारताच्या इतिहासात महत्त्वाची आहे.

**सातवाहन** : इसवी सन पूर्व पहिल्या शतकात सातवाहन सत्तेचा उदय झाला. महाराष्ट्र, मध्यप्रदेश व आंध्रप्रदेश या प्रदेशांत त्यांचे राज्य होते. महाराष्ट्रातील 'प्रतिष्ठान' म्हणजे सध्याचे 'पैठण' ही त्यांची राजधानी होती.

सातवाहन घराण्यातील गौतमीपुत्र सातकर्णी हा राजा विशेष प्रसिद्ध आहे. नाशिकच्या लेण्यांतील एका शिलालेखात त्याच्या राज्यविस्ताराचा उल्लेख असून त्याचा उल्लेख 'त्रिसमुद्रतोयपीतवाहन' म्हणजे 'ज्याचे घोडे तीनही समुद्रांचे पाणी प्यायले आहेत असा' (अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि हिंदी महासागर), असे त्याच्या पराक्रमाचे वर्णन केले आहे.



नाणेघाट

सातवाहन काळात व्यापार मोठ्या प्रमाणात वाढला. जुन्नरजवळील नाणेघाट हा व्यापारी दृष्टीने महत्त्वाचा होता. तेथील एका गुहेत नागनिका या सातवाहन राणीचा लेख भिंतीवर कोरलेला आहे. पैठण, तेर आणि भोकरदन येथील बाजारपेठांतून रोमपर्यंत माल जात होता. तसेच रोमच्या बाजारपेठेतून माल इकडे येत होता.

सातवाहन राजांच्या काळात भाजे, अजिंठा, जुन्नर, नाशिक, कार्ले, कान्हेरी येथील लेण्यांची निर्मिती झाली. याच काळात 'गाथासप्तशती' हा 'माहाराष्ट्री' प्राकृत भाषेतील काव्यग्रंथ रचला गेला. 'हाल' हा सातवाहन राजा त्याचा कर्ता होता असे मानले जाते.




The territorial waters of India extends into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. Based upon survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright, 2007.

**वाकाटक** : इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात विदर्भात उदयाला आलेल्या या घराण्याची स्थापना विंध्यशक्ती या राजाने केली. वाकाटकांची सत्ता मध्यप्रदेशापासून दक्षिणेस तुंगभद्रा नदीपर्यंत पसरलेली होती. पहिला प्रवरसेन हा सर्वांत प्रसिद्ध वाकाटक राजा होता. त्याने वाकाटकांचे राज्य उत्तरेस नर्मदा नदीपर्यंत, दक्षिणेस कोल्हापूरपर्यंत वाढवले. हरिषेण हा वाकाटकांचा शेवटचा महत्त्वाचा राजा होय. हरिषेणाचा मंत्री वराहदेव हा बौद्ध धर्माचा अनुयायी होता. त्यानेच अजिंठा येथील १६ क्रमांकाचे लेणे खोदवून घेतले.

वाकाटकांचे प्रशासन कार्यक्षम होते. कला व साहित्य यांना त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यांच्या काळात 'माहाराष्ट्री' या प्राकृत भाषेत विपुल ग्रंथरचना झाली. संस्कृत वाङ्मयाचा विकास या काळात झाला. प्रसिद्ध संस्कृत कवी कालिदास याने 'मेघदूत' हे काव्य याच काळात लिहिले असावे.



अजिंठा लेणी

**चालुक्य** : इसवी सनाच्या सहाव्या शतकात पहिला पुलकेशी याने चालुक्य घराण्याची सत्ता स्थापन केली. आजच्या कर्नाटक राज्यात 'बदामी' येथे या घराण्याची राजधानी होती म्हणून त्यांना 'बदामीचे

चालुक्य' असे म्हणतात. चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याने सम्राट हर्षवर्धनाचे आक्रमण परतवून लावले होते.

चालुक्यांच्या काळात अनेक तलाव व मंदिरे बांधली गेली. त्यांपैकी बदामी, ऐहोळे व पट्टदकल येथे बांधलेली मंदिरे प्रसिद्ध आहेत. या




पट्टदकल येथील मंदिर

काळात संस्कृत व कन्नड भाषेत विपुल साहित्य निर्माण झाले. पूज्यपाद, सामंतभद्र यांच्यासारखे प्रतिभावंत कन्नड कवी चालुक्य काळात निर्माण झाले.

**पल्लव** : इसवी सनाच्या सहाव्या शतकात दक्षिण भारतात चालुक्य सत्तेबरोबरच पल्लवांची सत्ताही प्रबळ होती. 'कांची' ही पल्लवांची राजधानी होती. 'महेंद्रवर्मा' हा पल्लव राजा कर्तबगार आणि विद्‌वान होता. त्याने संगीतावरही ग्रंथ लिहिला. तसेच त्याने चित्रकला, शिल्पकला इत्यादी कलांना प्रोत्साहन दिले.

महेंद्रवर्माचा मुलगा नरसिंहवर्मा हा पराक्रमी होता. चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याचा त्याने पराभव केला होता. त्याच्या काळात चिनी प्रवासी

युआन श्वांग याने कांचीला भेट दिली होती. प्रसिद्ध संस्कृत कवी 'भारवी' पल्लवांच्या दरबारी होता. नरसिंहवर्माच्या काळात महाबलिपुरम येथील प्रसिद्ध रथमंदिरे तयार झाली. पल्लव राजे विद्या व कलांना प्रोत्साहन देणारे होते.



महाबलीपुरम येथील रथमंदिर

पल्लवांचे आरमार प्रबळ व सुसज्ज होते. त्यांच्या काळात भारताचा आग्नेय आशियाशी जवळचा संबंध आला. पल्लव काळात देशांतर्गत व देशाबाहेरील व्यापार भरभराटीला आला होता. पल्लव राजे शैव व वैष्णव पंथाचे आश्रयदाते होते. त्यांच्या राज्यात सर्व धर्मांच्या लोकांना सहिष्णुतेने व न्यायाने वागवले जाई, असे वर्णन युआन श्वांग या चिनी प्रवाशाने केले आहे.

**संघम (संगम) साहित्य** : दक्षिण भारतात विद्वान साहित्यिकांच्या सभा वेगवेगळ्या कालखंडांत भरवल्या गेल्या. त्याला संघम म्हणत. त्यात सर्व विद्वान एकत्र येऊन चर्चा करत. त्यांच्याकडून जी साहित्यनिर्मिती

झाली त्याला 'संघम साहित्य' असे म्हणतात. हे साहित्य तमीळ या भाषेत निर्माण झाले. संघम साहित्यात गद्य व पद्य असे दोन्ही प्रकार आहेत. संघम साहित्यातील 'सिलप्पधिकरम' व 'मणिमेखलाई' ही दोन महाकाव्ये प्रसिद्ध आहेत. या साहित्यामधून दक्षिण भारताचा प्राचीन इतिहास व लोकजीवनाची माहिती मिळते.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) महाराष्ट्रातील 'प्रतिष्ठान' म्हणजे सध्याचे ............. ही सातवाहन राजांची राजधानी होती.

(आ) हरिषेणाचा मंत्री ............... हा बौद्ध धर्माचा अनुयायी होता.

(इ) वाकाटकांच्या काळात .......... या प्राकृत भाषेत विपुल ग्रंथरचना झाली.

(ई) नरसिंहवर्माच्या काळात महाबलिपुरम येथील प्रसिद्ध.......... तयार झाली.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) दक्षिण भारतात कोणत्या महत्त्वाच्या सत्ता होत्या?

(आ) 'त्रिसमुद्रतोयपीतवाहन' म्हणजे काय?

(इ) चालुक्य काळात कोणते कन्नड कवी होते?

(ई) महेंद्रवर्मा या राजाने कोणत्या कलांना प्रोत्साहन दिले?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सातवाहनांच्या काळातील व्यापाराची माहिती द्या.

(आ) संघम साहित्य कशाला म्हणतात?

**उपक्रम**

भारताच्या नकाशात सातवाहन, वाकाटक, चालुक्य, पल्लव या सत्ता दाखवा.

# १३. भारत : सांस्कृतिक

इ.स.पू. ३०० ते इ.स. ८०० या कालखंडात भारतात झालेल्या सांस्कृतिक घडामोडींचा आढावा आपण या पाठात घेणार आहोत.

**भाषा व साहित्य** : या काळात संस्कृत व प्रादेशिक भाषांमधून विपुल साहित्य निर्माण झाले. अश्वघोष या कवीने 'बुद्धचरित' हे प्रसिद्ध काव्य लिहिले. भासाचे 'स्वप्नवासवदत्त' हे संस्कृत नाटक प्रसिद्ध आहे. 'मनुस्मृती' हा ग्रंथ या काळात रचला गेला. पतंजलीचे 'महाभाष्य', भरतमुनीचे 'नाट्यशास्त्र', 'तिपिटक' हे बौद्ध धर्मग्रंथ व 'आगम' हे जैन धर्मग्रंथ या काळात लिहिले गेले.

'महाभारत' व 'रामायण' ही जगप्रसिद्ध महाकाव्ये आहेत. संस्कृत भाषेतील या महाकाव्यांमधून त्या काळातील सामाजिक जीवनाची विपुल माहिती मिळते. 'भगवद्गीता' हा हिंदूंचा पवित्र ग्रंथ महाभारताचाच एक भाग आहे. 'फळाची अपेक्षा न धरता प्रत्येकाने आपले कर्तव्य करावे,' अशी गीतेची शिकवण आहे. भक्ती हा आत्मोद्धाराचा मार्ग आहे आणि तो सर्वांसाठी खुला आहे, हे गीतेने सांगितले आहे.

सुप्रसिद्ध संस्कृत कवी व नाटककार कालिदास या काळात होऊन गेला. त्याचे 'शाकुंतल' हे नाटक व 'मेघदूत' हे भावपूर्ण काव्य प्रसिद्ध आहे. विशाखदत्ताचे 'मुद्राराक्षस', शूद्रकाचे 'मृच्छकटिक' ही नाटके तर बाणभट्टाचा 'हर्षचरित' हा चरित्रग्रंथ याच काळात रचला गेला. विष्णुशर्माने लिहिलेला 'पंचतंत्र' हा एक लोकप्रिय ग्रंथ आहे.

**वैद्यकशास्त्र** : भारतीय वैद्यकशास्त्रात 'चरकसंहिता' या ग्रंथात वैद्यकीय चिकित्साशास्त्र आणि औषधशास्त्र यांची सविस्तर माहिती दिलेली आहे. हा ग्रंथ चरक याने लिहिला आहे. सुश्रुत या शल्यविशारदाने आपल्या ग्रंथात शस्त्रक्रियेची माहिती दिली आहे. वाग्भटाने आपल्या

वैद्यकशास्त्रावरील ग्रंथात रोगांची लक्षणे, उपचार या विषयांवर चर्चा केली आहे. सिद्ध नागार्जुन याने लिहिलेल्या 'रसरत्नाकर' या ग्रंथात विविध रसायने व शुद्ध धातू तसेच रासायनिक प्रक्रिया यांची माहिती आहे.

**गणित व खगोलशास्त्र** : गणित शास्त्रातील भारतीयांची कामगिरी फार मोलाची आहे. १ ते ९ अंक व ० ही संख्या यांचा वापर भारतीयांनी प्रथम केला. या अंकांची एकं, दहं अशा स्थानानुसार किंमत बदलते, या संकल्पनेचा शोध भारतीयांनी लावला. आर्यभट या भारतीय गणितज्ञाने अशा संख्यांचा वापर रूढ केला. वर्गमूळ काढणे, क्षेत्रफळ काढणे, घनफळ काढणे अशा अनेक गणिती क्रियांची सूत्रे आर्यभटाच्या ग्रंथात आहेत. आर्यभट हा खगोलशास्त्रज्ञही होता. पृथ्वी सूर्याभोवती फिरते, असे त्याने सांगितले. वराहमिहिर व ब्रम्हगुप्त हेही उत्तम गणिती व खगोलशास्त्रज्ञ होते.

**आद्य शंकराचार्य** : वैदिक धर्मातील कर्मकांड महत्त्वाचे नसून तत्त्वज्ञान महत्त्वाचे आहे असे आद्य शंकराचार्यांनी सांगितले. भक्ती, शुद्धाचरण आणि विवेक यांच्या समन्वयातून त्यांनी वैदिक धर्माला नवे स्वरूप प्राप्त करून दिले. त्यासाठी त्यांनी भारतभर प्रवास केला. त्यांनी वैदिक तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठी 'ब्रह्मसूत्रभाष्य,' 'गीताभाष्य' हे ग्रंथ लिहिले.



आद्य शंकराचार्य

**शिक्षण** : शिक्षणाची अनेक केंद्रे या काळात उदयास आली. तक्षशिला, वाराणसी, वलभी, विक्रमशीला, नालंदा, कांची ही शिक्षणाची

उल्लेखनीय केंद्रे होती. या विद्यापीठांतून तत्त्वज्ञान, व्याकरण, तर्कशास्त्र, वैद्यकशास्त्र हे विषय शिकवले जात. नालंदा विद्यापीठाची कीर्ती सर्वदूर पसरली होती. परदेशांतूनही विद्यार्थी तेथे येत असत. विद्यार्थ्यांना त्यात प्रवेश घेण्यासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागे. एका वेळी दहा हजार विद्यार्थी तेथे शिक्षण घेऊ शकत, एवढे ते विद्यापीठ भव्य होते.

**कला व स्थापत्य** : भारतीय स्थापत्यकलेचा विकास मौर्य काळापासून झाला. गुप्त काळात तिने उत्कर्ष गाठला. स्तूप, लेणी, विहार, मंदिरे, स्तंभ अशा प्रकारचे स्थापत्य निर्माण झाले. सम्राट अशोकाने सांची येथे स्तूप बांधला. पुढे शुंग व सातवाहन राजांनी त्याची पुनर्बांधणी केली. येथील प्रवेशद्वारांवर जातक कथा व गौतम बुद्धांच्या जीवनातील प्रसंग कोरले आहेत.



सांची स्तूप

महाराष्ट्रातील कार्ला येथील बौद्ध चैत्यगृह व विहार उल्लेखनीय आहेत. नाशिक व जुन्नर परिसरातही अशी बौद्ध लेणी खोदली गेली. अजिंठा येथील लेण्यांत बुद्धाच्या मूर्ती व बहुरंगी भित्तिचित्रे आहेत. या चित्रांमध्ये गौतम बुद्धांच्या जीवनातील प्रसंग रेखाटले आहेत. वेरूळच्या

लेण्यांपैकी कैलास मंदिर हे जगप्रसिद्ध आहे. मुंबईजवळच्या घारापुरी बेटावरील लेण्यात 'सदाशिव' ही शंकराची भव्य मूर्ती आहे.

**धातुकाम :** दिल्लीजवळील मेहरौली येथे असलेला लोहस्तंभ गुप्तांच्या काळातील धातुकाम कौशल्याचा उत्कृष्ट नमुना आहे. या स्तंभाची उंची सुमारे सात मीटर आहे. आज शेकडो वर्षे उलटली तरीही या स्तंभावर गंज चढलेला नाही. प्राचीन भारतात तांबे आणि कांस्य यांच्या ओतीव मूर्ती घडवत असत.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) सुश्रुत याने आपल्या ग्रंथात .......... माहिती दिली आहे.

(आ) सम्राट अशोकाने .......... येथे स्तूप बांधला.

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) अश्वघोष | (१) रसरत्नाकर |
| (आ) भास | (२) बुद्धचरित |
| (इ) कालिदास | (३) स्वप्नवासवदत्त |
| (ई) विशाखदत्त | (४) मेघदूत |
| | (५) मुद्राराक्षस |

**३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) नालंदा, कांची या विद्यापीठांतून कोणते विषय शिकवले जात?

(आ) रसरत्नाकर या ग्रंथात कोणती माहिती आहे?

**४. कारणे लिहा.**

(अ) नालंदा विद्यापीठाची कीर्ती सर्वदूर पसरली होती.

(आ) मेहरौली येथील लोहस्तंभ हा धातुकाम कौशल्याचा उत्कृष्ट नमुना आहे.

**उपक्रम**

अजिंठा लेण्यांमधील शिल्पे आणि चित्रे यांच्या छायाचित्रांचा संग्रह करा.

# १४. प्राचीन भारत आणि जग

हडप्पा संस्कृतीच्या काळापासूनच भारताचे इतर देशांशी व्यापारी संबंध आलेले होते. पुढे भारत आणि या देशांत सांस्कृतिक देवाणघेवाणही सुरू झाली. कालांतराने राजकीय संबंधही वाढू लागले.

**भारत आणि पश्चिमेकडील देश :** प्राचीन काळापासून भारतीयांचे पश्चिमेकडील देशांशी व्यापारी संबंध होते. रोमन साम्राज्याच्या स्थापनेनंतर भारत आणि रोम यांच्यामधील व्यापार भरभराटीला आला. भारतातून तलम कापड, सुगंधी द्रव्ये, मोती, मौल्यवान खडे व मसाल्याचे पदार्थ रोमला निर्यात होत असत. भडोच, कल्याण, सोपारा, चौल, कालिकत यांसारख्या बंदरांना या व्यापारामुळे महत्त्व प्राप्त झाले.

भारताचा माल अरब व्यापारी इजिप्तमधील अलेक्झांड्रिया बंदरापर्यंत घेऊन जात. अरबी लोकांमार्फत युरोपातील लोकांना भारतीय तत्त्वज्ञान व विज्ञान यांचा परिचय झाला. गणितातील 'शून्य' ही भारतीय संकल्पना अरबांमार्फत युरोपात पोचली.

**भारत आणि इतर आशियाई देश :** इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापासून पूर्वेकडील आणि आग्नेयेकडील देशांशी भारताचा घनिष्ठ संबंध येऊ लागला. भारताच्या संस्कृतीचा प्रभाव म्यानमार, थायलंड, इंडोनेशिया, श्रीलंका या देशांवर विशेष पडला.



सिगिरिया लेण्यांतील चित्र


**श्रीलंका :** सम्राट अशोकाने आपला मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना बौद्ध धर्माचा प्रसार

करण्यासाठी श्रीलंकेत पाठवले होते. भारताचे श्रीलंकेशी व्यापारी संबंध होते. श्रीलंकेतील मोती व इतर मौल्यवान वस्तूंना भारतात मोठ्या प्रमाणात मागणी होती. सिगिरिया येथील लेण्यांतील चित्रांवर अजिंठा चित्रशैलीचा प्रभाव आहे. श्रीलंकेत लिहिले गेलेले 'दीपवंश' आणि 'महावंश' हे बौद्ध ग्रंथ भारत व श्रीलंकेच्या परस्पर संबंधांची माहिती देतात.

**चीन :** चीन हा देश भारतासारखाच प्राचीन संस्कृती असलेला देश आहे. फार पूर्वीपासून चीनशी भारताचे संबंध होते. चीनमध्ये तयार होणाऱ्या रेशमी कापडाला भारतात मोठी मागणी होती. चीनमधून पश्चिमेकडच्या देशांना रेशमाचा पुरवठा होई. हा व्यापार भारतीय व्यापाऱ्यांच्या मध्यस्थीने होत असे.

बौद्ध धर्माबद्दल जिज्ञासा वाटल्यामुळे चिनी सम्राटाने धर्मरक्षक आणि कश्यपमातंग या बौद्ध भिक्खूंना चीनमध्ये बोलावून घेतले. त्यांनी अनेक बौद्ध ग्रंथांची चिनी भाषेत भाषांतरे केली. चीनच्या सम्राटाने बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे बौद्ध धर्माचा प्रसार तेथे झपाट्याने झाला.

**आग्नेय आशियातील देश :** व्यापारासाठी किंवा धर्मप्रसारासाठी भारतातील लोक म्यानमार, कंबोडिया, थायलंड, इंडोनेशिया या देशांमध्ये जाऊन स्थायिक होऊ लागले. त्यामुळे तेथील लोकांना भारतीय संस्कृतीचा जवळून परिचय झाला. इंडोनेशियातही भारतीय संस्कृतीचा प्रभाव असलेली काही राज्ये होती. भारतातून या प्रदेशात व्यापाऱ्यांबरोबर गेलेल्या लोकांनी भारतीय तत्त्वज्ञान, आचार-विचार व धर्मकल्पना नेल्या. अनेक बौद्ध आणि हिंदू मंदिरे आजही या देशांमधून पाहायला मिळतात. इंडोनेशियातील बोरोबुदूर येथील बौद्ध स्तूपावर भारतीय स्थापत्यकलेचा फार मोठा प्रभाव आहे.




The territorial waters of India extends into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. Based upon survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright, 1999.



बोरोबुदूर येथील स्तूप

आग्नेय आशियाच्या कला व सांस्कृतिक जीवनावर भारतीय संस्कृतीचा फार खोलवर ठसा उमटला आहे. आजही रामायण - महाभारतातील कथांवर आधारलेली नृत्य-नाट्ये इंडोनेशियात लोकप्रिय आहेत.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) भारताचा माल अरब व्यापारी इजिप्तमधील....... बंदरापर्यंत घेऊन जात.

(आ) सिगिरिया येथील लेण्यांतील चित्रांवर ...... चित्रशैलीचा प्रभाव आहे.

(इ) चीनमध्ये तयार होणाऱ्या ...... कापडाला भारतात मोठी मागणी होती.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) भारतातून रोमला कोणत्या वस्तू निर्यात होत असत?

(आ) भारत व श्रीलंकेच्या परस्पर संबंधांची माहिती कोणत्या ग्रंथांत आहे?

३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) चीनमध्ये बौद्‌ध धर्माचा प्रसार का झाला?

(आ) आग्नेय आशियातील लोकांना भारतीय संस्कृतीचा परिचय कशामुळे झाला?

**उपक्रम**


चीन, म्यानमार, इंडोनेशिया, श्रीलंका, थायलंड यांपैकी कोणत्याही एका देशाची सविस्तर माहिती मिळवा.




# परिशिष्ट

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अवशेष | - | Remains |
| २. | अश्मयुग | - | Stone Age |
| ३. | इसवी सन पूर्व | - | Before Christ (B.C.) |
| ४. | इसवी सन | - | Anno Domini (A.D.) |
| ५. | तर्कशास्त्र | - | Logic |
| ६. | तत्त्वज्ञान | - | Philosophy |
| ७. | ताम्रपट | - | Copper plate |
| ८. | तासणी | - | Scraper |
| ९. | नगररचना | - | Town planning |
| १०. | नवाश्मयुग | - | Neolithic Age |
| ११. | नागर संस्कृती | - | Civilization |
| १२. | पुरातत्त्वीय उत्खनन | - | Archaeological excavation |
| १३. | पुरातत्त्व विद्या | - | Archaeology |
| १४. | प्राचीन भारत | - | Ancient India |
| १५. | भौतिक साधने | - | Material sources |
| १६. | मातृदेवता | - | Mother goddess |
| १७. | मौखिक साधने | - | Oral sources |
| १८. | राजदूत | - | Ambassador |
| १९. | राजेशाही | - | Monarchy |

| | | | |
|---|---|---|---|
| २०. | लिखित साधने | - | Written sources |
| २१. | वास्तुविशारद | - | Architect |
| २२. | वैदिक वाङ्मय | - | Vedic literature |
| २३. | वैद्यकशास्त्र | - | The science of medicine |
| २४. | शिलालेख | - | Stone inscription |
| २५. | शिल्पकला | - | Sculpture |
| २६. | सम्राट | - | Emperor |
| २७. | संघम साहित्य | - | Sangham literature |
| २८. | स्तंभलेख | - | Pillar inscription |
| २९. | हडप्पा संस्कृती | - | Harappan civilization |
| ३०. | हातकुऱ्हाड | - | Hand-axe |







महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

रु.१०.००